रयत शिक्षण संस्थेचे,

# लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा

ता. मोखाडा, जि. पालघर

नॅक पुनर्मूल्यांकन A+ Grade (3.43 CGPA)

# संस्कृती

२०२२-२३










इमारतीचे उद्‌घाटन करताना रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण
डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब व इतर मान्यवर




रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब यांचा
सत्कार करताना संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील



इमारतीचे उद्‌घाटन व नामकरण सोहळ्यानिमित्त मनोगत व्यक्त करताना
पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब

संस्थापक

रयत शिक्षण संस्था, सातारा



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

डी.लिट्.

## आमचे आधारस्तंभ



**पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार**

**अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा**

# आमचे प्रेरणास्थान



**मा. डॉ. अनिल पाटील**

चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

## आमचे आदर्श



# मा. रामशेठ ठाकूर

**सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

# संस्था पदाधिकारी



## मा. शरदचंद्रजी पवार

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



## मा.डॉ. अनिल पाटील

चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



## मा. ॲड. भगीरथ शिंदे

व्हा. चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

# संस्था पदाधिकारी



**मा. रामशेठ ठाकूर**
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा. बाळाराम पाटील**
चेअरमन, रायगड विभाग,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा.प्रिं.डॉ. विठ्ठल शिवणकर**
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा.प्रिं.डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
ऑडीटर, रयत शिक्षण संस्था, सातारा
सहसचिव, उच्च शिक्षण



**मा. राजेंद्र साळुंखे**
सहसचिव, माध्य.,
रयत शिक्षण संस्था, सातारा

# कुशल नेतृत्व




मा. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर




नॅक पुनर्मूल्यांकनात महाविद्यालयास A + श्रेणी मिळाल्याबद्दल सन्मानित करताना
पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब

# विद्यार्थी परिषद



**कु. ईश्वर मौळे**
सचिव, विद्यार्थी परिषद



**अर्चना थेतले**
एफ.वाय. बी.एस्सी.



**धिरेश जाधव**
एस.वाय. बी.एस्सी.



**कल्पना गावित**
एफ.वाय. बी. ए.



**चंचला पाटेकर**
एस.वाय. बी. ए.



**कुणाल गोडे**
टी. वाय. बी. ए.



**युवराज बुरबुडे**
एफ.वाय. बी.कॉम.



**चेतन गाटे**
एस.वाय. बी. कॉम.



**सूरज गोविंद**
टी. वाय. बी. कॉम.



**किशोर मौळे**
एम. ए. (I)



**निखिल पाटील**
एम. ए. (II)



**मनोज वारघडे**
क्रीडा प्रतिनिधी



**सुनयना जाधव**
सांस्कृतिक प्रतिनिधी



**अमोल थाळेकर**
रा.से.यो. प्रतिनिधी



**विशाल माळी**
प्राचार्य नियुक्त



**हर्षला गवळी**
प्राचार्य नियुक्त

# नॅक समितीची महाविद्यालयास भेट

(चेअरमन- डॉ. विजयालक्ष्मी मुव्वा, समन्वयक- डॉ. बी. एच. सुरेश, सदस्य- प्रिं. डॉ. हौध मोहिद्दीन एम.)



नॅक समितीचे महाविद्यालयात आगमन



सायटेक सोयामेट प्रकल्पास भेट




महिला सबलीकरण विभागास भेट



आदिवासी संस्कृती दालनास भेट



मत्स्यपालन प्रशिक्षण केंद्रास भेट



नॅक अहवाल सादर करताना

# इतिहास विभाग




नॅक समितीची इतिहास विभागास भेट



दुर्गा रघुनाथ महाले या विद्यार्थिनीची महाराष्ट्र पोलिसमध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर



दिपक नडगे हा विद्यार्थी गांधी विचार संस्कार परिक्षेत पालघर जिल्ह्यात प्रथम आला. त्याचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर



इतिहास विभाग आयोजित 'इतिहास विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. सोनवणे



रयत शिक्षण संस्थेचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा व एस. जी. व्ही. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओंदे, ता. विक्रमगड यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विभाग आयोजित 'वास्तुसंग्रहालयशास्त्रातून रोजगार निर्मिती' या विषयावरील एकदिवशीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन




इतिहास विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल (त्रिरश्मी लेणी, नाशिक)

# मराठी विभाग



एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत 'मराठी भाषेचे स्वरूप व कार्य' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. चंद्रशेखर घुगे



'प्रसारमाध्यमांमधील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना पत्रकार श्री. मनोज कामडी



'मराठी भाषा गौरव दिन' सोहळ्या निमित्त मार्गदर्शन करताना प्रा. भीमराज पगारे



श्रावणी कवी संमेलनामध्ये कविता सादर करताना कवी, मा. हनीफ शेख



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा शुभारंभप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. एस. एस. पारखे



आदिवासी संस्कृतीतील लोप पावत चाललेल्या लोकगीतांची ओळख करून देताना श्री. भास्कर पांडुरंग राऊत

# सांस्कृतिक विभाग



मुंबई विद्यापीठ आयोजित ५५ व्या युवा महोत्सवामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करताना विद्यापीठाचे मान्यवर



आदिवासी संस्कृती दर्शन लोकनृत्य सादर करताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी



तारपा नृत्य सादर करताना महाविद्यालयातील विद्यार्थी



कोळीगीत सादर करताना टी. वाय. बी.ए. चे विद्यार्थी



'स्टॉल डे' चे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व प्राध्यापक



'संस्कृती दर्शन' या कार्यक्रमातील सांघिक छायाचित्र

# वाणिज्य विभाग



नॅक समितीची वाणिज्य विभागास भेट



राज्यस्तरीय उद्योजकता विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, प्रा. एस. जी. मेंगाळ व इतर



राज्यस्तरीय उद्योजकता विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. माहेश्वरी झिरपे, प्रा. रीट थुले, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, प्रा. एस. जी. मेंगाळ व डॉ. ए. एन. चांदोरे



वाणिज्य मंडळ अंतर्गत ग्राहक संरक्षण या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. बी. जी. शिद, प्रा. एस. जी. मेंगाळ, प्रा. जे. ए. कुंभार, प्रा. एस. के. डामसे व प्रा. डी. आर. भोये



वाणिज्य मंडळ उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. बी. जी. शिद, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, प्रा. एस. जी. मेंगाळ व प्रा. एस. के. डामसे



ट्रेड फेअर अंतर्गत स्टॉलची पाहणी करताना प्रमुख पाहुणे श्री. के. एन. जगदाळे, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व सहकारी

# जिमखाना विभाग



नॅक समितीची जिमखाना विभागास भेट



नॅक पुनर्मूल्यांकन भेटीपूर्वी सदिच्छा देण्यासाठी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब, व्हाईस चेअरमन मा. भगीरथ शिंदे साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एल . डी . भोर



दादा पाटील महाविद्यालय कर्जत जिल्हा अहमदनगर यांच्याशी जिमखाना विभाग सामंजस्य करार



मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन



वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथे आंतरमहाविद्यालयीन मॅरेथॉन स्पर्धेत चौथा क्रमांक प्राप्त करणारा मनोज लक्ष्मण हिलीम याला सन्मानीत करताना मान्यवर



मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रनिंग स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित उपक्रम



महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना मा. खा. रामशेठ ठाकूर, ॲड. भगीरथ शिंदे, जि. प. अध्यक्ष श्री. प्रकाश निकम व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर



नशेरा गावातील गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करताना प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, डॉ. आर. एस. डूबल, डॉ. ए. एन. चांदोरे व सहकारी प्राध्यापक



महाविद्यालय परिसरात श्रमदान करताना रा. से. यो. स्वयंसेवक



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणांतर्गत प्रात्यक्षिके दाखविताना कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. जी. मेंगाळ




राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. सुभाष सैंदनशिव




मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवस सप्ताहानिमित्त पतंग शाह कुटीर रुग्णालय यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिर

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित उपक्रम



एड्स जाणीव जागृती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ. सुवर्णा पाटील, डॉ. अयाज शेख, डॉ. अरुण चांदोरे व इतर मान्यवर



नशेरा येथे पथनाट्य सादर करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक



आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना श्री. श्रीकांत चौधरी



भेंडीचा पाडा येथे श्रमदान करताना रा. से. यो. स्वयंसेवक



हर घर तिरंगा कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी



प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदन

# राष्ट्रीय सेवा योजना (विशेष श्रमसंस्कार शिबीर)




राष्ट्रीय सेवा योजना शिबीर उद्घाटन समारंभ प्रसंगी श्री. संतोष मते, श्री. रवी भागवत, सौ. प्रमीला वांगड, श्री. लक्ष्मण शिंगाडे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व सहकारी




राष्ट्रीय सेवा योजना शिबीर समारोप समारंभ प्रसंगी श्री. मकरंद बात्रे, श्री. लक्ष्मण शिंगाडे, श्री. गंगाराम वांगड व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर



नवीवाडी येथील शाळेची रंगरंगोटी करताना रा.से.यो.चे स्वयंसेवक




शिबीर कालावधीत दीपक फाऊंडेशनच्या सहकार्याने राबविलेले मोफत आरोग्य तपासणी शिबीर व मोफत औषध वाटप



शिबीर कालावधीत स्वच्छता केलेला पाणवठा



शिबीर कालावधीत नवीवाडी शाळेसाठी मैदान तयार करताना स्वयंसेवक

## कृतज्ञता सप्ताह मा. शरदरावजी पवार साहेब




मा. शरदरावजी पवार साहेब यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त महिला आरोग्य तपसणी शिबिरात प्रमुख पाहुणे मा. प्रदीप खैर यांचा सत्कार करताना महाविद्यालाचे प्राचार्य. डॉ . एल. डी. भोर



बचत गटाविषयी महिलांना मार्गदर्शन करताना जि.प.सदस्या, श्रीमती. सारिकाताई निकम




मा. शरदरावजी पवार साहेब यांच्या ८२ व्या वाढदिवस सप्ताह निमित्त धावण्याच्या स्पर्धेचे उद्घाटन करताना श्री. अर्जुन शेळके, श्री. फारुक पिंजारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व सहभागी विद्यार्थी



टाकपाडा या गावात 'अंधश्रद्धा निर्मुलन' या विषयावर पथनाट्य सादर करताना महाविद्यालयातील विद्यार्थी व उपस्थित मान्यवर



पुस्तक प्रदर्शनाची पाहणी करताना मा. संजयकुमार ब्राम्हणे (PSI), उल्हास धारणे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. डी. भोर




वृक्षारोपण करताना मा. श्री. संतोष मते, श्री. रवी भागवत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. डी. भोर व इतर मान्यवर

# प्राणिशास्त्र विभाग



नॅक समितीची प्राणिशास्त्र विभागास भेट



प्राणिशास्त्र विभागांतर्गत जागतिक वन्यजीव सप्ताह आयोजन



प्राणिशास्त्र विभागांतर्गत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन



प्राणिशास्त्र विभागांतर्गत ग्लास अक्वेरिअम कन्स्ट्रक्शन ट्रेनिंग प्रोग्राम आयोजन



नशेरा, ता. मोखाडा येथे पोस्टर प्रदर्शनाच्या माध्यमातून जनजागृती कार्यक्रम



नॅक समितीची सेंद्रिय खत युनिटला भेट

# रसायनशास्त्र विभाग



नॅक समितीची रसायनशास्त्र विभागास भेट



सायन्स असोसिएशनचे उद्घाटनात मार्गदर्शन करताना डॉ. शरद कांबळे



संशोधन समिती आणि रसायनशास्त्र विभागातर्फे आयोजित NEP-2020 या विषयावरील कार्यशाळेत द न्यू कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ. एन. व्ही. पवार मार्गदर्शन करताना



रसायनशास्त्र विभागांतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम पाण्याच्या गुणवत्तेच्या मापदंडांचे परीक्षण करताना पत्रकार श्री. मनोज कामडी, प्राचार्य एल. डी. भोर व विद्यार्थी



महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील क्लीनिंग एजंट्सच्या तयारीसाठी हँड्स-ऑन ट्रेनिंग आणि परफ्यूम तयार करताना डॉ. व्ही. बी. गाडे व विद्यार्थी



BC बुक बँक अंतर्गत गॅस क्रोमॅटोग्राफी ॲण्ड इट्स ॲप्लिकेशन्स या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. मनोहर जोपळे, ACS कॉलेज, त्र्यंबकेश्वर

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे मा. राजेंद्र कटीलकर यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर



मा. भास्कर राऊत यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह स्वीकारताना कु. अक्षय जाधव



डॉ. संतोष जाधव यांच्या शुभ हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारताना कु. शिवाजी वळवी



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना मा. राजेंद्र कटीलकर



प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांच्या शुभ हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारताना कु. मित्तल वारघडे



प्रमुख पाहुणे मा. राजेंद्र कटीलकर यांच्या शुभ हस्ते आदर्श विद्यार्थी पुरस्कार स्वीकारताना कु. देवराज बारात

# वनस्पतीशास्त्र विभाग



वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित भरडधान्य प्रदर्शन कार्यशाळा क्षणचित्र



नॅक समितीची बोटॅनिकल गार्डनला भेट



नॅक समितीची वनस्पतीशास्त्र विभागास भेट



'वृक्ष दत्तक योजना' अंतर्गत मोफत फळझाड रोपेवाटप करताना वन विभागाचे अधिकारी मा. श्री. आर. एम. निकम



पालक शिक्षक मेळाव्यात सहभागी विद्यार्थी



वृक्षारोपण करताना महाविद्यालयातील प्राध्यापक

# अर्थशास्त्र विभाग



अर्थशास्त्र विभागांतर्गत आयोजित 'लाइव्ह बजेट कार्यक्रम-२०२३'चे थेट प्रक्षेपण क्षणचित्र



अर्थशास्त्र विभागांतर्गत राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020: वैशिष्ट्ये आणि आव्हाने' या विषयासंबंधी मार्गदर्शन करताना डॉ. वीरेंद्र सिंह मत्सानिया



नॅक समितीची अर्थशास्त्र विभागास भेट



अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोखाड्यातील 'राईस मिल'ला दिलेल्या भेटीचे क्षणचित्र



अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी पवारपाडा गावातील लोकांना 'दैनंदिन जीवनातील आर्थिक नियोजनाचे महत्त्व' पटवून देण्यासाठी दिलेल्या भेटीचे क्षणचित्र



अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी पवारपाडा गावाचे सर्व्हेक्षण करताना

# गणित विभाग



नॅक समितीची गणित विभागास भेट



गणित विभागांतर्गत महान भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त कार्यशाळा आयोजन



MOU अंतर्गत मार्गदर्शन करताना श्री. वैभव जगताप



गणित विभागांतर्गत रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजन



प्रजासत्ताक दिनानिमित्त वॉलपेपर स्पर्धेत सहभागी विद्यार्थी



गणित विभागांतर्गत विद्यार्थी सेमिनार

# भौतिकशास्त्र विभाग




नॅक समितीची भौतिकशास्त्र विभागास भेट




भौतिकशास्त्र विभागांतर्गत उर्जा संवर्धन व सौर उर्जेचा उपयोग यावरील एकदिवशीय कार्यशाळा आयोजन




भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी परिसर भेट ग्रामीण रुग्णालय मोखाडा वैद्यकीय अधिकारी समवेत



प्रयोगशाळेमध्ये प्रात्यक्षिक करताना टी. वाय. बी.एस्सी.विद्यार्थी



भौतिकशास्त्र प्रयोगशाळा



आय. सी. टी. टूल्सचा वापर करून शिकवताना भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक

# जयंती व पुण्यतिथी



पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व उपस्थित डॉ. निलेश पवार



बाळासाहेब ठाकरे व सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी .भोर व इतर मान्यवर



राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदनशिव व इतर मान्यवर



क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व इतर मान्यवर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व इतर मान्यवर



महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयातील सेवक

## जमले आजी-माजी विद्यार्थी

### नॅकच्या पार्श्वभूमीवर पार पडला मेळावा



## मोखाडा महाविद्यालयात बायोफ्लॉक प्रशिक्षण केंद्र सुरु

मोखाडा : पालघर जिल्ह्यामधील ग्रामीण समाजाला उदरनिर्वाहाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी मटेरीफ या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा येथे बायोफ्लोक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आलेले आहे सदर प्रकल्पाचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन आ. भगीरथ काका शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला.



बायोफ्लोक प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

बायोफ्लोक मत्स्यपालन केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतल्यानंतर बायोफ्लोक फिश फार्मिंगचा प्रकल्प आपल्या शेतामध्ये तयार करून त्यातून मत्स्योत्पादन उत्पन्न मिळवले जाऊ शकते. शेतीला जोडधंदा म्हणून मत्स्यबायोफ्लोक फिश फार्मिंग प्रकल्प नक्कीच फायदेशीर ठरू शकतो असे प्रतिपादन रामशेठ ठाकूर साहेब यांनी केले. तसेच बारकाईने चौकशी करून नवीन उपक्रमासाठी शुभेच्छादेखील दिल्या.

या मत्स्यपालन केंद्राचा मोखाडा-जव्हार आदिवासी परिसरातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आदरणीय भगीरथ काका शिंदे यांनी केले आहे. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. आर. एस. डुबल, बायोफ्लोक प्रशिक्षण केंद्र प्रमुख प्रा. डॉ. ए. एस. शेख, व कमिटीतील सदस्य उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनो, तुम्ही उद्याचे शास्त्रज्ञ आहात - डॉ. कांबळे



मोखाडा : रयत शिक्षण संस्थेचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान मंडळाचे उद्घाटन व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. शरद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक घटकामध्ये विज्ञान आहे व ते मानले पाहिजे, तसेच वेगवेगळ्या माध्यमातून विज्ञानाचे महत्त्व पटून दिले व विद्यार्थ्यांना तुम्ही उद्याचे शास्त्रज्ञ आहात असे उद्गार काढले. तुमच्या मधली चिकित्सक वृत्ती बाहेर येऊ द्या! तरच आपला भारत देश महासत्ता बनेल असा संदेश दिला, तर मोखाडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. किशोर देसले यांनी विद्यार्थ्यांना कुपोषण व मुलींच्या आरोग्याच्या समस्या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. मेंगाळ यांनी विज्ञानाने केलेली प्रगती व त्याचे मूल्य यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. चांदोरे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किरण पारधी यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन रसायनशास्त्र विभागाने केले होते.



## नॅक पुनर्मूल्यांकनात ठाकूर महाविद्यालयाला मिळाली 'ए प्लस' श्रेणी

लोकमत न्यूज नेटवर्क

खोडाळा : मोखाडा येथील रयत शिक्षणसंस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. २६ आणि २७ एप्रिल रोजी द्वितीय नॅक पुनर्मूल्यांकनासाठी बेंगलोरहून नॅक कमिटी आली होती. या द्वितीय नॅक पुनर्मूल्यांकनात महाविद्यालयाला ए प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे.

कमिटीचे चेअरमन डॉ. विश्वनाथी मुव्वा (आचार्य नागार्जुन विद्यापीठ गुंटूर, आंध्र प्रदेश) सदस्य, समन्वयक डॉ. बी. एच. सुरेश (मैसूर विद्यापीठ), सदस्य, डॉ. हाय मोहिद्दीन एम.( हाजी करुथा राउथर हावोदिया कॉलेज उथमापलायम) यांनी महाविद्यालयाला भेट दिली. महाविद्यालयात राबविलेल्या बेस्ट प्रॅक्टिस अंतर्गत डिजिटल साक्षरता केंद्र, बायोफ्लोक प्रशिक्षण केंद्र, सायटेक सोपमेट प्रकल्पांतर्गत मोखाडा केंद्रातील दहा जिल्हा परिषद शाळांना सोपामेकिंग मशीन वाटप करण्यात आल्या होत्या. या सर्व प्रकल्पांचे नॅक टीमने कौतुक केले. सायटेक सोपमेट प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी ओंबेपाणी या शाळेला कमिटीने भेट दिली. महाविद्यालयाच्या या यशामध्ये रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, ॲड. भगीरथ शिंदे, रामशेठ ठाकूर, डॉ. विठ्ठल शिवणकर, शिवलिंग मेणकुदळे, रोहिदास ठाकूर, आमदार बाळाराम पाटील आदींचा वाटा आहे.

## मोखाडा महाविद्यालयात "प्रसारमाध्यमांमधील करिअरच्या संधी" विषयावर व्याख्यान



### ■ मोखाडा महाविद्यालयाचे यश ■

## 'युवा महोत्सवा'त सहा पारितोषिके

जव्हार, (वा.) शांताराम भाऊ घोलप आर्ट्स, सायन्स आणि गोटीरामभाऊ पवार कॉमर्स कॉलेज शिवळे (ता. मुरबाड जि. ठाणे) येथे नुकताच मुंबई विद्यापीठ अंतर्गत ५५ वा विभागिय 'युवा महोत्सव' पार पडला. यात वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत मोखाडा महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये त्यांनी तब्बल सहा पारितोषिके पटकावून घवघवीत यश संपादन करीत महाविद्यालयाचे नाव लौकिक केले.



विद्यार्थ्यांच्या कला गुणांना चालना मिळावी म्हणून दरवर्षी मुंबई विद्यापीठाकडे युवा महोत्सव आयोजित केला जातो. यंदा ५५ वा युवा महोत्सव होता. यावेळी ठाणे व पालघर विभागाचे आयोजन मुरबाड येथील शिवळे महाविद्यालयात केले होते. जवळपास या दोन्ही जिल्ह्यातील २० पेक्षाही अधिक महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदवला होता. यात पालघर जिल्ह्यातील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा युवा सहभागी होते. मोखाडा महाविद्यालयातील विद्यार्थी वैभव गवारी (कोलाज) प्रथम क्रमांक, सारथ लोकनृत्य द्वितीय क्रमांक, मिताक वारघडे स्टोरी टेलिंग (कथा कथन) द्वितीय क्रमांक, सुनैना जाधव (मेहंदी) तृतीय क्रमांक, कुणाल गोडे (कथा लिखाण) तसेच देवराज वारास वाघे (पोस्टर मेकिंग, भित्तीपत्रिका) या प्रकारात उत्तेजनार्थ कामगिरी केली.

### दिव्यांग देवराजचे देखील कौतुक

या सर्व ही विद्यार्थ्यांपैकी देवराज वारास हा हाताने दिव्यांग असुन देखील त्याने अतिशय सुरेख कलाक रेखाटून उपस्थित शिक्षक, मान्यवर, व स्पर्धक यांना हेल्मेट वापरणे संबंधी उत्तम संदेश दिला, त्याच्या या अतिशय कलेबद्दल युवा महोत्सव परीक्षकांनी त्याचे विशेष कौतुक केले. त्याचे मनोबल वाढावे यासाठी त्याला 'उत्तेजनार्थ' प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### विद्यार्थ्यांना शुभेच्छा

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या अभुतपूर्व यशाबद्दल त्यांचे रयत शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी भरभरून कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आदिवासींच्या शैक्षणिक उन्नतीमध्ये रयत शिक्षण संस्थेचे मोठे योगदान - पवार

मोखाडा (पालघर) : रयत शिक्षण संस्थेने आदिवासींच्या शैक्षणिक उन्नतीकरिता मोठे योगदान दिले आहे. यापुढेही योगदान देत राहू, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. एकंदरीत राज्यात आदिवासींची लोकसंख्या आहे त्या प्रमाणात आदिवासींच्या हिताची तरतूद केली पाहिजे. यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पातील आदिवासींच्या विकासासाठी १० टक्के एकूण खर्च केला जावे, याबाबत तरतूद करण्यात आली. परंतु याची आज अंमलबजावणी होत नसल्याने नाराजीदेखील त्यांनी व्यक्त केली.



यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांसारखा झोकून देणारा दूरदृष्टी नेता महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राने ध्यानात घ्यावे लागेल. त्यांनी हे शिक्षणाची ज्ञानगंगा खेडोपाड्यापर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य केले. एका शाळेपासून झालेली सुरुवात आज संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाचा मोठा वटवृक्ष निर्माण केला असल्याचे पवारांनी सांगितले. रयत शिक्षण संस्थेने विद्यार्थी घडवण्याचे काम जेवढे केले आहे तेवढे देशामध्ये कोणत्याही संस्थेने केले नाही. फुले, शाहू, आंबेडकर व कर्मवीरांनी देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. आजच नेहमीच फुलेंचे नाव घेतो. फुले दाम्पत्याने शिक्षणाबरोबरच समाजाला आधुनिकतेचे धडे दिले असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील होते. यावेळी पालकमंत्री रवींद्र चव्हाण, भगीरथ शिंदे, आ. प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, खा. राजेंद्र गावित, आ. सुनील भुसारा, जि.प. अध्यक्ष प्रकाश निकम, मोखाडा नगराध्यक्ष अमोल पाटील, पंचायत समिती सभापती भास्कर थेतले, जि.प. सदस्य हबीब शेख आदी उपस्थित होते.

## आदिवासींच्या शिक्षणासाठी 'रयत' सर्वस्व देणार

### खासदार शरद पवार यांचे मोखाड्यात प्रतिपादन



## मोखाडा महाविद्यालयात उद्योजक घडवण्यास मिळाले बळ!



# मोखाडा महाविद्यालयात भरडधान्य प्रदर्शन व कार्यशाळा संपन्न

मोखाडा : अन्न आणि कृषी संघटना आणि संयुक्त राष्ट्रांनी भरडधान्याचे आरोग्य आणि पौष्टिक फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. त्यानिमित्ताने रयत शिक्षण संस्थेचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्याललयात वनस्पतिशास्त्र आणि विभागामार्फत मोखाडा परिसरातील भरडधान्य यांचे प्रदर्शन आणि एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भरडधान्य प्रदर्शनात मोखाडा परिसरातील ज्वारी, नाचणी, बाजरी, वरई, गहू, राळा, भात, पांढरी नागली, लाल नागली याचे बियाणे व इतर धान्य या धान्याचे प्रदर्शन



धान्य प्रदर्शनाप्रसंगी विद्यार्थ्यांसह अधिकारी दिसत आहे.

एस. जी. औटी (प्राध्यापक, एच. पी. टी. आर्ट आणि आर. वाय. के. सायन्स कॉलेज नाशिक) आणि डॉ. ए. व्ही. घोळवे (सह. प्राध्यापक, व्ही. एन. नाईक महाविद्यालय नाशिक) यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

प्रा. डॉ. एस. जी. औटी यांनी विद्यार्थ्यांना भरडधान्य त्यांचे

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे सकाळ सत्राचे उपप्राचार्य प्रा. एस. जी. मेंगाळ, दुपार सत्राचे उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदनशिव, नॅक समन्वयक डॉ. ए. एन. चांदोरे आणि इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित

# मोखाडा महाविद्यालयात कन्स्ट्रक्शन ऑफ ग्लास ॲक्वेरिअम ह्या विषयावर कार्यशाळेचे आयोजन



जव्हार-जितेंद्र मोरघा

# मोखाडा महाविद्यालयाच्या विविध विकास कामाच्या माध्यमातून आदिवासींच्या झोपडीपर्यंत पोचले



# ग्रंथ हेच गुरू, वाचाल तर वाचाल - डॉ. एल.डी. भोर

लोकमत न्यूज नेटवर्क

मोखाडा : कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी वाचन खूप आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालयातील ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असून मोठ्या प्रमाणावर पुस्तके, ग्रंथ तुमच्यासाठी उपलब्ध आहेत, मात्र आपल्या विद्यार्थ्यांची ग्रंथालयात उपस्थिती खूप नगण्य आहे. ६०० मुलांसाठी २० हजार पुस्तके असतानाही वाचन संस्कृती वाढत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन वाढवावे. कारण वाचाल तर वाचाल, असे प्रतिपादन प्राचार्य एल.डी. भोर यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्ताने मोखाडा कला व वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालय प्रदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

# मराठी भाषेचे स्वरूप व कार्य या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

जव्हार-जितेंद्र मोरघा



# 'आजादी का अमृत महोत्सवा' निमित्ताने मोखाडा महाविद्यालयात इतिहास विभागामार्फत विविध उपक्रम



# रयत शिक्षण संस्थेच्या संकुलाच्या उद्घाटनासाठी खा. शरद पवार मोखाड्यात



# राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य रयत शिक्षण संस्थेच्या कॉलेजात विज्ञान मंडळाचे उद्घाटन



मोखाडा (वार्ताहर) :

# मोखाडा महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

मोखाडा : रयत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा येथे महाविद्यालयीन वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग अत्यंत कार्यशीलतेने काम करत असुन विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील करतात.

मोखाडा महाविद्यालयांत झालेल्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. युवा महोत्सवात झोनल विभागात दुसरा क्रमांक व मुंबई विद्यापीठात तृतीय क्रमांक मिळालेला तारपा डान्स, आदिवासी संस्कृती दर्शन, कोळीगीत, वैक्तिक व सामुहिक डान्स, वैक्तिक व सामुहिक गीते,



स्नेहसंमेलनात आदिवासी नृत्य सादर करताना विद्यार्थी.

समाज प्रबोधनपर नाटिका अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविकात सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. उत्येकर यांनी केले तसेच याप्रसंगी त्यांनी वर्षभरातील झालेल्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा घेतला.

या कार्यक्रमासाठी नॅक समन्वयक प्रा. डॉ. चांदोरे प्रा. डॉ. जाधव, प्रा. भोये, साऊंड सिस्टम-जयंत भुसारे व इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता सामूहिक डान्सने झाली. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. किरण पारधी व प्रा. संघरत्न तायडे यांनी केले.




इमारतीचे उद्घाटन व नामकरण सोहळ्यानिमित्त मनोगत व्यक्त करताना चेअरमन डॉ. अनिल पाटील साहेब




इमारतीचे उद्घाटन व नामकरण सोहळ्यानिमित्त मनोगत व्यक्त करताना व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे साहेब



इमारतीचे उद्घाटन व नामकरण सोहळ्यानिमित्त मनोगत व्यक्त करताना पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. रवींद्र चव्हाण साहेब




व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा
प्रमुख उपस्थिती
मा. रामशेठ ठाकूर


महाविद्यालय, मोखाडा

रयत शिक्षण संस्थेचे,

# लोकनेते रामशेठ ठाकूर
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा

स्थापना : जून १९८४

नॅक पुनर्मूल्यांकन A+ Grade (3.43 CGPA)



दूरध्वनी : (०२५२९) २५६६२८ I Website : wwww.asccmokhada.in
Email : asccmokhada@gmail.com


# संस्कृती


अंक अकरावा : २०२२-२३ नियतकालिक

संपादक मंडळ

**अध्यक्ष**
प्राचार्य, डॉ. एल. डी. भोर

**प्रमुख संपादक**
प्रा. टी. एम. पराडके

**सह संपादक**
प्रा. एस. जी. मेंगाळ
प्रा. एस. ई. सैंदनशिव
प्रा. आर. डी. घाटाळ

**मुखपृष्ठ संकल्पना**
डॉ. एस. एच. जाधव

**अंतर्गत मांडणी**
डॉ. वाय. एच. उलवेकर

**मुद्रक**
विकास प्रिंटींग ॲण्ड करिअर्स प्रा. लि.
३२, एम.आय.डी.सी., सातपूर,
नाशिक.





अंक दहावा : २०२१-२२

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' – कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा ता. मोखाडा, जि. पालघर

## महाविद्यालय विकास समिती (२०२२-२३ ते २०२६-२७)

| | | |
|---|---|---|
| **मा.श्री. रामशेठ ठाकूर** | चेअरमन प्रतिनिधी | चेअरमन |
| **मा.श्री.ॲड. भगीरथ शिंदे** | स्थानिक प्रतिनिधी (शिक्षण क्षेत्र) | सदस्य |
| **मा.आमदार श्री. बाळाराम पाटील** | संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| **मा.आमदार श्री. सुनील भुसारा** | स्थानिक प्रतिनिधी (समाजसेवा क्षेत्र) | सदस्य |
| **मा. श्री. प्रकाश निकम** | स्थानिक प्रतिनिधी (उद्योग क्षेत्र) | सदस्य |
| **मा. श्री. कुणाल लाडे** | स्थानिक प्रतिनिधी (माजी विद्यार्थी) | सदस्य |
| **मा. प्रा. एस. ई. सैंदनशिव** | प्राध्यापक प्रतिनिधी | सदस्य |
| **मा. डॉ. आर. डी. नागरगोजे** | प्राध्यापक प्रतिनिधी | सदस्य |
| **मा. डॉ. एस. के. पवार** | प्राध्यापिका प्रतिनिधी | सदस्य |
| **मा. डॉ. ए. एन. चांदोरे** | समन्वयक, आय.क्यु.ए.सी. | सदस्य |
| **मा. श्री. पी. एम. धावणे** | प्राचार्य नियुक्त विभाग प्रमुख | सदस्य |
| **मा. श्री. डी. के. आहेर** | शिक्षकेत्तर सेवक (प्रतिनिधी) | सदस्य |
| **मा. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर** | प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा | सचिव |

# प्राचार्यांचे मनोगत ...

महाविद्यालयाचे अंतरंग म्हणजे 'संस्कृती' वार्षिक अंक होय. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असणारे शैक्षणिक, सांस्कृतिक,साहित्यिक,भौतिक क्षेत्रातील घडामोडींचे प्रतिबिंब म्हणजे 'संस्कृती' अंक होय.'संस्कृती' वार्षिक नियतकालिक प्रकाशानाच्या निमित्ताने आपल्याशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्रातील बहुजनांच्या शैक्षणिक, सामाजिक ,सांस्कृतिक उन्नतीसाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून ज्ञानमंदिरे उभारली. त्यातीलच कर्मवीरांच्या प्रेरणेतून मोखाडा येथील आदिवासी दुर्गम भागात उभे राहिलेले हे एक ज्ञानमंदिर होय. या महाविद्यालयाची स्थापना १९८४ साली झाली. आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडवावे, जागतिकीकरणाच्या प्रवाहात या महाविद्यालयातील विद्यार्थी मागे राहू नये म्हणून आम्ही सतत प्रयत्नशील असतो.

संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील साहेब, व्हाईस चेअरमन अँड. भगीरथ शिंदे साहेब यांचे मार्गदर्शन व प्रेरणा आणि महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या उदार अशा देणगीतून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी सर्व भौतिक सोयीसुविधा तयार केल्या आहेत.

महाराष्ट्राचा जाणता राजा म्हणुन ओळखले जाणारे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांनी रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यांशी चर्चा करून मोखाडा महाविद्यालयास 'लोकनेते रामशेठ ठाकूर' यांचे नाव देण्याचा उचित निर्णय घेतला. महाविद्यालय इमारत उद्घाटन व नामकरण समारंभप्रसंगी भाषण करताना त्यांनी 'रयतचे हितचिंतक' ही रामशेठ ठाकूर यांची ओळख अधोरेखित केली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाची घेतलेली भूमिका, त्यातून शिक्षणाची ज्ञानगंगा आदिवासींसह सर्व घरांपर्यंत पोहोचविण्याचा घेतलेला वसा आणि कमवा आणि शिका या योजनेतून घडलेला 'माजी विद्यार्थी' म्हणुन रामशेठजी याच भूमिकेला पुढे नेत आहेत. रयत शिक्षण संस्था व तिने चालविलेले शैक्षणिक कार्य यामध्ये 'जिथे कमी तिथे मी' ही रामशेठजींची भूमिका राहिलेली आहे. 'आपण मागितले आणि रामशेठजींनी दिले'हे रामशेठजींचे दातृत्व कायम रयतच्या पाठीशी आहे हा शरदचंद्र पवार साहेबांचा आजवरचा अनुभव असल्याकारणाने मोखाडा महाविद्यालय इमारत उद्घाटन व नामकरण सोहळ्यासाठी ते आवर्जून उपस्थित राहिले.

संशोधनामध्ये आदिवासी विद्यार्थी मागे पडू नये म्हणून महाविद्यालयाने मागील वर्षात साडेपाच लाख रुपयाचा निधी प्राध्यापकांनी खर्च केला आहे. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी पाच पेटंट राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले आहेत . गरजू व होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण राहू नये, म्हणून 'कमावा व शिका योजना' सुरू केली आहे. विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण सहज व वेळेत पूर्ण करता यावे यासाठी संपूर्ण मोखाडा परिसरासाठी जे.एम.फायनन्सिअल फाउंडेशन व एन.आय.आय.टी. फाउंडेशन यांच्या सहकार्याने डिजिटल साक्षरता केंद्र सुरू केलेले आहे. आता पर्यंत महाविद्यालयाचे ९०० विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षणाचे ट्रेनिंग दिले आहे. ९७ विद्यार्थांची या केंद्रातून प्लेसमेंट झाली आहे. हे सांगताना मला विशेष आनंद होत आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी व त्यांना उद्योजकीय शिक्षण मिळावे. यासाठी महाविद्यालयाने 'द एनर्जी रिसोर्स सेंटर इन्स्टिट्यूट' ( टेरी) यांच्या सहकार्याने मत्स्यपालन प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. मोखाडासारख्या आदिवासी परिसरातील कुपोषण रोखण्यासाठी महाविद्यालयाने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून सायन्स अँड टेक्नोलॉजी पार्क, पुणे तसेच फिनोलेक्स पाईप इंडस्ट्रीज व मुकुल माधव फौंडेशन पुणे यांच्या सहकार्याने परिसरातील दहा प्राथमिक शाळा मार्फत मुलांना सोयामिल्क उपलब्ध केलेले आहे. यातून मुलांची शैक्षणिक, बौद्धिक व आरोग्य विषयक प्रगती झाल्याचे प्रथमतः निर्दशनास येते. याचबरोबर महाविद्यालयाने विविध खेळ, सांस्कृतिक उपक्रम व विद्यार्थ्यांच्या संपूर्ण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आयोजित ५५ व्या युवा महोत्सवाची फायनल नृत्य स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील एकूण दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात तारपा या भारतीय लोकनृत्य प्रकारामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला होता.

महाविद्यालयात दिनांक २६ आणि २७ एप्रिल २०२३ रोजी द्वितीय नॅक पुनर्मूल्यांकनासाठी बेंगलोरहून नॅक कमिटी आली होती. या कमिटीचे चेअरमन डॉ. विजयालक्ष्मी मुव्वा (आचार्य नागार्जुन विद्यापीठ गंटूर, आंध्रप्रदेश) सदस्य, समन्वयक डॉ. बी. एच. सुरेश (म्हैसूर विद्यापीठ ), सदस्य, प्रिं. हौध मोहिद्दीन एम.( हाजी करूथा राउथर हवोदिया कॉलेज उथामापलायन) हे होते. या द्वितीय नॅक पुनर्मूल्यांकनात महाविद्यालयाला A+ Grade (3.43CGPA) श्रेणी प्राप्त झाली आहे. मोखाडा महाविद्यालयाने मिळविलेल्या उतुंग यशामुळे पालघर जिल्ह्यातील एक उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून मोखाड्याची ओळख यापुढे निर्माण होईल. भविष्यकाळात मोखाडा महाविद्यालय हे केवळ आदिवासी नाही तर ज्ञानाचा, आनंदाचा उजेड निर्माण करणारं, नवकल्पनांच्या स्टार्टअपद्वारे नव परिवर्तन करण्यात अग्रेसर असलेलं, रामशेठजींनी भक्कम पाया रचलेल्या स्वप्नाला प्रत्यक्षात साकारणारं महाविद्यालय असेल.

**– प्राचार्य डॉ. एल. डी. भोर**



# संपादकीय...

मित्रहो

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा संस्कृती अंक आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे.प्रबोधन पर्वात अनेक महनीय समाज सुधारकांनी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत मोलाची कामगिरी केली. महात्मा फुले, महर्षी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन कर्मवीरांनी शिक्षणाचे दारे बहुजनांसाठी खुली केली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला तोड नाही! त्यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. त्याचेच मूर्तिमंत रूप म्हणजे आपले मोखाडा येथील महाविद्यालय. कर्मवीरांच्या विचारांना मूर्त रूप देण्याचे प्रयत्न महाविद्यालय निष्ठेने करीत आहे. अर्थात महाविद्यालयाच्या विकासामध्ये सर्वांचा सिंहाचा वाटा आहे हे विसरून चालणार नाही.

कोणत्याही महाविद्यालयाचे नियतकालिक हे त्या महाविद्यालयाचा आरसा असतो. सदर संस्कृती अंकात विविध विषयावरील विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख, स्वलिखित कविता, वैचारिक लेख, ऐतिहासिक लेख इ.चा समावेश करण्यात आला आहे. मराठी, इंग्रजी वाणिज्य, विज्ञान व इत्यादी वरील लेख विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे फळ आहे. आपणास हे साहित्य नक्कीच आवडेल असा मला विश्वास आहे.

चालू शैक्षणिक वर्षातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे महाविद्यालयात दिनांक २६ आणि २७ एप्रिल २०२३ रोजी द्वितीय नॅक पुनर्मूल्यांकनासाठी बेंगलोरहून नॅक कमिटी आली होती. या कमिटीचे चेअरमन डॉ. विजयालक्ष्मी मुव्वा (आचार्य नागार्जुन विद्यापीठ गंटूर, आंध्रप्रदेश) सदस्य, समन्वयक डॉ. बी. एच. सुरेश (म्हैसूर विद्यापीठ) व सदस्य, प्रिं. हौध मोहिद्दीन एम.( हाजी करूथा राउथर हवोदिया कॉलेज उथामापलायन) हे होते. या द्वितीय नॅक पुनर्मूल्यांकनात महाविद्यालयाला A+ Grade (3.43 CGPA) श्रेणी प्राप्त झाली आहे. महाविद्यालयाच्या इतिहासातील ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. अर्थात मा. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांचे कुशल व दुरदर्शी नेतृत्व, प्रत्येक सहकाऱ्यांवर दाखवलेला विश्वास, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची वृत्ती व सर्व सदस्यांचे सहकार्य यामुळे हे शक्य होऊ शकले.

संपादनाच्या आणि संयोजनाच्या संदर्भात अनेक विविध स्वरूपाचे सहकार्य सर्वांकडून मला मिळाले मा. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी दिलेले स्वातंत्र्य दाखविलेला विश्वास, प्रेरणा, सहकार्य व मार्गदर्शन यामुळे मी संपादनाचे काम यशस्वीपणे पूर्ण करू शकलो, याचा विशेष आनंद आहे. माझ्या कामावर विश्वास टाकणारे माझे संपादक मंडळ, मुखपृष्ठसाठी समर्पक कल्पना सुचविणारे प्रा. डॉ. एस. एच. जाधव, अंतर्गत सजावटीची दक्षता घेणारे डॉ. वाय .एच. उलवेकर, मुद्रित शोधनास मदत करणारे प्रा. एस. जी. मेंगाळ व विकास प्रिंटिंग अँड कॅरीअर्स प्रा. लि. या सर्वांचे मी आभार मानतो तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांबद्दल प्रमुख संपादक या नात्याने मी कृतज्ञता व्यक्त करतो.

**– प्रा. टी. एम. पराडके**

# भावपूर्ण श्रद्धांजली

**या शैक्षणिक वर्षात राज्य, राष्ट्रीय, जागतिक स्तरावर किर्तीमान राजधुरंदर, मातृभूमीच्या रक्षणार्थ शहीद झालेले भारतमातेचे शूरवीर, जागतिक किर्तीचे साहित्यिक, विचारवंत, कलावंत, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, संस्थेतील व महाविद्यालयातील सेवक, विद्यार्थी व त्यांचे आप्तेष्ट, संस्थेवर प्रेम करणारे स्नेहीजण व नैसर्गिक आपत्तीत प्राण गमावलेले देशबांधव... यापैकी दिवंगत झालेल्यांना 'संस्कृती'चे आदरपूर्वक अभिवादन! महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत!**



# दृष्टिक्षेपात महाविद्यालय

उद्योजकता विकास केंद्रातर्गत मत्स्यपालन व प्रशिक्षणाची मोफत सोय

विविध शॉर्ट टर्म कोर्सेस व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

प्रत्येक विभागाची निकालाची उज्ज्वल परंपरा

श्रम संस्कृती जोपासणारी राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयास नॅक समितीकडून A+ ग्रेड प्राप्त

सायटेक सोयामेट प्रकल्प

वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व गणित या विषयातून विज्ञान पदवीच्या शिक्षणाची सोय

मराठी वाड्मय मंडळ, वाणिज्य मंडळ, इतिहास विद्यार्थी मंडळ, विज्ञान मंडळ, नियोजन मंडळ असे सहशैक्षणिक उपक्रम

डिजीटल साक्षरता कार्यक्रमांतर्गत मोफत आयटी कोर्सेस व करिअर मार्गदर्शन

निसर्गरम्य परिसर, पायाभूत सोयीसुविधायुक्त, सुसज्ज इमारत

इतिहास, अर्थशास्त्र, मराठी विषयातून व वाणिज्य शाखेतून पदवी शिक्षणाची सोय

११ वी व १२ वी या वर्गासाठी व्यवसायाभिमुख पदविका अभ्यासक्रमाची सोय (एच.एस.व्ही.सी.)

समृद्ध, प्रशस्त संगणकीकृत ग्रंथालय

कमवा व शिका योजना

आदिवासी दुर्गम भागात महाविद्यालयाची स्थापना – १९८४

मुंबई विद्यापीठाची कायमस्वरूपी संलग्नता

इतिहास विषयातून पदव्युत्तर शिक्षणाची सोय

सी.ओ.सी., स्पर्धा परीक्षा, बँकिंग, व्यवसाय मार्गदर्शनविषयक स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष

मा. प्राध्यापकांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदेत शोध निबंध सादर



# रयत गीत

रयतेमधूनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे

कर्मवीरांचे ज्ञानपीठ हे, शक्तिपीठही ठरते आहे
शाहुफुल्यांचे समानतेचे तत्त्व मानसी मुरते आहे
धर्मजातीच्या पार गांधींचे मूल्य मानवी जपतो आहे

गरिबांसाठी लेणी मोडून लक्ष्मी वहिनी झाली आई
कमवा आणि शिका मंत्र हा, तरूणाईला प्रेरक होई
स्वावलंबी वृत्ती ठेवून ज्ञानसाधना करतो आहे

दीन दलितांसाठी अण्णा, तुमची झिजली चंदनकाया
अनाथ जीवा सदा लाभली मातृहृदयी तुमची माया
शून्यामधल्या नवसृष्टीचा निर्मिक तोही ठरतो आहे

जीवनातला तिमिर जावा प्रबोधनाची पहाट व्हावी
इथे लाभले पंख लेऊनी उंच भरारी नभात घ्यावी
प्रतिभाशाली बहुजनांचा वेलू गगनी चढतो आहे
रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे...

कवी - विठ्ठल वाघ

## दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट : नियम ०८ फॉर्म ०४ प्रमाणे निवेदन

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, ता. मोखाडा, जि. पालघर |
| प्रकाशन काल | : | वार्षिक |
| प्रकाशक | : | प्राचार्य, डॉ. एल. डी. भोर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, ता. मोखाडा, जि. पालघर पिन - ४०१ ६०४, दूरध्वनी : (०२५२९) २५६६२८ |
| प्रमुख संपादक | : | प्रा. टी. एम. पराडके |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| मुद्रकाचे नाव | : | विकास प्रिंटींग ॲण्ड करिअर्स प्रा. लि. |
| पत्ता | : | ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक. मो. ०२५३ - २३५१०१० |
| स्वामित्व | : | रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा. |

मी. प्राचार्य, डॉ. एल. डी. भोर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती/ तपशील माझ्या माहिती समजुतीप्रमाणे खरी आहे.

**प्राचार्य,**
**डॉ. एल. डी. भोर**

या अंकातील मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

(फक्त खाजगी वितरणासाठी)



# गद्य विभाग...

कोणत्याही व्यक्तीसमोर आपण व्यक्त होणं कितपत योग्य आहे? बऱ्याचदा आपण विचार न करता आपली मत मांडतो. आणि कित्येक वेळा समोरच्याला काय वाटेल म्हणून गप्प बसतो. खरं तर कोणत्याही गोष्टीपासून अलिप्त राहणं नेहमीच योग्य. कितीही प्रयत्न  केला तरी आपण समोरच्याला बदलू शकत नाही, आणि तसे करणे चुकीचं ठरेल. काही क्षणात आपण आपलं प्रेम, राग, द्वेष व्यक्त करतो. पण जर समोरच्या व्यक्तीने त्याची तसदी घेतली नाही तर काय अर्थ आहे त्या व्यक्त होण्याला, मग त्या क्षणी अलिप्त राहणेच योग्य असते. त्रास होतो ह्या गोष्टीचा पण मतभेद टळतात. आपण आपलं खाणंपिणं कोणी विसरत नाही, नित्य दिनचर्या चालू असते. मग नेमकं आपण जेव्हा बोलतो की वेळ नाही तेव्हा वेळेचा भाग असतो की प्राधान्य देण्याचा. जी गोष्ट महत्वाची असते ती त्यावेळी होतेच ना. मग आपण त्या व्यक्तीच्या आयुष्यात पर्यायी म्हणून असतो का? अशावेळी स्वतःच्या समाधानासाठी व्यक्त होणे कधीही चुकीचं. आपला आत्मसन्मान जपून अलिप्त राहणंच योग्य.

– व. पु. काळे

# अंतरंग


१. **मला भावलेले रामशेठ ठाकूर** ............ प्राचार्य डॉ. एल. डी.भोर

२. **माझं महाविद्यालय** ............ सोमनाथ गावित (टी.वाय.बी.ए.)

३. THE SOCIO-ECONOMICS PROBLEMS OF TRIBAL COMMUNITY OF MOKHADA TALUKA ............ डॉ. यशवंत एच. उलवेकर

४. **ग्रामीण भारतातील ई–कॉमर्स** ............ रमेश शिद (टी.वाय.बी.कॉम.)

५. **भारतातील विम्याचे भविष्य** ............ कु. कामडी भारती पांडुरंग (एस.वाय.बी.कॉम.)

६. **रखाण : मोखाडा तालुक्यातील एक गुहा** ............ तुळशीराम नंदू दिघा (एफ.वाय.बी.ए.)

७. **कार्ल मार्क्स** ............ मनोज भगिरथ वारघडे (एम.ए. II)

८. **The Indian Scientists** ............ Yogesh B. Warghade (F.Y., B.Sc.)

९. **स्वराज्याचे साक्षीदार किल्ले** ............ तुषार संतोष पाटील (एम.ए. II)

१०. **Wonder of Science** ............ Ashwini Laxman Khutade (S.Y., B.Sc.)

११. **CONSTITUTION OF INDIA** ............ Mittal Kamalakar Warghade (S.Y.B.Sc.)

१२. **Sigmund Freud's Theories of Personality** ............ Kalpesh Korde (S.Y.B.A.)

१३. **वैदिक गणित** ............ कु. अश्विनी राजेंद्र पाटील (टी.वाय. बी.एस्सी.)

१४. **आयुष्य सोपं–सुरळीत करतो तो गणित** ............ मनोज काशिनाथ बुरंगे

१५. **निसर्गातील पर्यटनाचा ऱ्हास** ............ विश्वनाथ किसन गावित

१६. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** ............ मित्तल चंद्रकांत फाळके (एम.ए. II)

१७. **भारतातील आदिवासींची ओळख, संस्कृती, समाजजीवन** ............ दर्शना तुकाराम गवारी (एम.ए. II)

१८. **ध्येयाकडे जाताना...** ............ प्रा. किरण पारधी

१९. **वर्तनवाद** ............ सुभाष भोये (एस.वाय. बी.ए.)

२०. **Polio** ............ Akshay Sawanji Mali (F.Y.B.Sc.)

२१. **माणूस आणि समाज** ............ कांतीलाल लहारे (एफ.वाय.बी.ए.)

२२. **ई–बँकिंग** ............ शरद देवराम आचारी (एस.वाय.बी. कॉम.)

२३. **Concept of Communication** ............ Shivaji Valvi (F.Y.B.A.)

# मला भावलेले रामशेठ ठाकूर : प्राचार्य डॉ. एल. डी. भोर

रामशेठ ठाकूर यांना कोणी 'राम' म्हटले; कोणी 'शेठ' म्हटले; कोणी 'लोकनेते' म्हटले; तर कोणी 'दानशेठ' म्हटले. याचे कारण रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच दात्याची भूमिका वठवीत जमलेली संपत्ती वाटण्याचेच काम केले. मी २००८ साली मोखाडा येथील महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा हाती घेतली तेव्हा, मलाही रामशेठजींच्या या श्रीमंतीची ओळख झाली होती. कारण महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्ताने देणग्या गोळा करत असताना मी जेव्हा पनवेलला रामशेठजींना भेटायला गेलो तेव्हा मी अनुभवले की, माझ्यासारखे अनेक जण रामशेठजींकडे मदत मागण्यासाठी दररोजच येत होते आणि जणू दारी आलेल्या निर्मुखी न पाठविण्याचा भारतीय संस्कृतीचा धर्म रामशेठजी वेगळ्या पद्धतीने पाळत कोणालाही रिकामा हाती जाऊ देत नव्हते. पुढे जसजसा माझा वेगवेगळ्या निमित्ताने रामशेठजिंशी संबंध येत गेला, तसतशी त्यांच्या या दातृत्वशीलतेची, सांपत्तीक वैभवाची ओळख दृढ होत गेली. पण यापेक्षाही मला अधिक भावत गेले तेत्यांच्यातील माणूसपण, भातृत्वभाव, शिक्षणप्रेमी वृत्ती, एखाद्यावर विश्वास टाकण्याचा दिलदारपणा, आणि मग त्याच्यासाठी स्वतःच सर्वस्व झोकून देत केलेले समर्पण!

रामशेठजींच्या या अनोख्या व्यक्तिमत्त्व पैलूंचे दर्शन मला निरनिराळ्या वेळी प्रसंगपरत्वे घडत गेले. २००८ ते २०११-१२ या काळात मोखाड्याला प्राचार्य म्हणून काम करताना रामशेठजींशी संपर्क आला असला तरी त्यांच्या मनातील माझी जागा करण्याइतका व त्यांच्यातला एक वेगळा माणूस दिसण्याइतका निकटचा प्रसंग कधी आला नव्हता. परंतु २०२१ साली निवृत्त होण्यापूर्वीच संस्थेच्या आदेशानुसार अतिरिक्त सेवेची संधी मिळून मी जेव्हा सावळज (जि. सांगली) येथे हजर होऊन काम सुरू केले तेव्हा; दरम्यान एक दिवस अचानक रामशेठजींचा फोन आला. आणि त्यांनी सांगितले की, मोखाडा येथे महाविद्यालय विकास समितीची बैठक आहे. त्यासाठी तुम्ही हजर राहायचे आहे. एवढ्या दूरच्या महाविद्यालयात बैठकीस मी हजर राहण्याचे कारण न कळल्याने मी संभ्रमित झालो. आणि ते स्पष्ट होण्याच्या अपेक्षेने मी आधी पनवेलला जाऊन रामशेठजींची भेट घेतली. तेव्हा मला सुखद धक्का देणारी गोष्ट कळली की, मी बैठकीला हजर तर राहायचे आहेच पण त्यापुढे मी मोखाडा महाविद्यालयाचे कामही हाती घ्यायचे आहे. पूर्वी तेथे काम केलेले असल्याने मोखाडा येथील आव्हानात्मक परिस्थितीची मला जाणीव होती.त्यामुळे मी क्षणभर धास्तावलोही. पण रामशेठजी व रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील साहेब, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथकाका शिंदे साहेब यांनी माझ्यावर दाखविलेला हा प्रचंड विश्वास, त्यातून मोखाडा येथील महाविद्यालयाच्या कामासाठी मला पात्र ठरवून त्यांनी टाकलेली जबाबदारी यांनी माझ्यात एक नवी उर्मी जागविली गेली आणि मी माझ्या नकळत होकार दिला.

ऑक्टोबर २०२१ मध्ये मोखाडा महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी रुजू होऊन मी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. तेव्हा कामासाठी लागणाऱ्या पैशांच्या ओघाबरोबरच मला रामशेठजींच्या ओघवत्या स्वभावाचा, त्यातील अनेकविध पैलूंचा असा काही नजरांना पहावयास मिळाला की, त्यामुळे मी कोणते व कसे काम करत गेलो, हे माझ्याही ध्यानी आले नाही. इमारती, प्रयोगशाळा व नॅकसाठी काय जे लागते ते उभे करा. त्यासाठी लागणारा पैसा मी देईन एवढ्या एकाच वाक्यात रामशेठजींनी त्यांचा माझ्यावरील विश्वास व्यक्त करून मला प्रचंड पाठबळ तर दिलेच; पण आदिवासींच्या मुलांची जबाबदारी ही मोठा भाऊ या नात्याने आपलीही जबाबदारी आहे, आदिवासीची सेवा ही परमेश्वराची सेवा समजून आपल्या शहरी व आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये सुविधांबाबत कोणतीही तफावत राहता कामा नये.हा अप्रत्यक्ष संदेश देऊन जणू आदिवासी बांधवांप्रतीची आपली कर्मनिष्ठाच माझ्यात ठसविली. पनवेल भेटीप्रसंगी अनेकवेळा लाखो रुपयाच्या रोख रकमा मला देऊन माझ्यावरील दृढ विश्वास दाखविला हे वर्णन करताना शब्दच अपुरे पडतात. यामुळे मी व माझ्या सहकाऱ्यांमध्येही आदिवासी विद्यार्थ्यांबद्दलचा एक नवा दृष्टिकोन जागृत झाला. त्यामुळे नव्या भक्तीने व शक्तीने आम्ही कामास लागलो. त्याची परीनिती, आदिवासी विद्यार्थ्यांची किव करणाऱ्या दृष्टीची, भावनेची जागा त्यांचा हेवा वाटण्यात परावर्तित व्हावी अशा दिमाखदार दोन इमारती महाविद्यालय परिसरात वर्षभरातच उभ्या राहिल्या. या इमारतींच्या कामांची पाहणी आणि महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीच्या निमित्ताने रामशेठजी वारंवार मोखाडासारख्या आडवळणी, दुर्गम व अडचणीच्या गावात येत राहिले.आदिवासी बांधवांविषयीची आत्मियता, तळमळ, त्यांच्या कल्याणाचा ध्यास यामुळे त्यांच्या सूक्ष्मवेधी दृष्टीला अनेक गोष्टी दिसू लागल्या असाव्यात. यामुळेच की काय, एकदा महाविद्यालयात येत असताना त्यांच्या नजरेत गेटवर असलेली वॉचमनची आदिवासी झोपडी भरली. लागलीच वळण घेऊन गाडी त्या झोपडीसमोर उभी

राहिली. उन्हाच्या तिरपिंनी उजळून निघणाऱ्या आणि पडणाऱ्या पावसाने भिजणाऱ्या त्या आदिवासी झोपडीत रामशेठजींनी बैठक मारून काहीशा भेदरलेल्या त्या आदिवासी दांपत्याशी हृदयसंवाद साधत अनेक बाबी जाणून घेतल्या. धांदल उडालेल्या प्राध्यापकांनी पाठविलेला चहा न घेता आदिवासी वॉचमेनच्या पती-पत्नीने केलेला कोरा चहा आवडीने प्यायला माळरानावरील जांभळीच्या झाडाखाली झालेल्या बैठकीत, वॉचमन केबिन पासून ते प्राचार्य केबिनपर्यंत कशा सोई-सुविधा आपल्याला अपेक्षित आहे हे त्यांनी अतिशय गंभीरपणे ऐकवले. त्यावेळचे त्यांच्या नजरेतील भाव, मित्र सुदामाच्या परिस्थितीने व्यथीत होऊन चिंतनात डूंबलेल्या कृष्णावतारी रामाचेच भाव मला वाटले.

वाटण्यासाठी पुढे केलेले हात काही झाले तरी आखडते न घेण्याचा रामशेठजींचा स्थायीभाव. त्यामुळेच असावे की, एकदा मिटींगला हजर राहण्यासाठी पनवेलहून वेळेत निघूनही ट्रॅफिक जामुळे रामशेठजींना पोहोचण्यास उशीर झाला. पण त्यांविषयी यत्किंचितही त्रागा न करता त्यांनी उशिराबद्दल दिलगिरी व्यक्त करत मिटींगला सुरुवात केली. उशिरा काम संपून झालेल्या जेवणावेळी समजले की या सगळ्या गडबडीत त्यांना नाश्ता करायलाही वेळ मिळालेला नव्हता. एवढेच नव्हे तर आदिवासींप्रतीच्या त्यांच्या बंधुभावाची जणू नियतीने परीक्षाच पाहण्याचे ठरविले होते. म्हणूनच की काय, पनवेल येथे परत जाताना अंधाऱ्या रात्री रस्त्यात त्यांची गाडी बंद पडली. तेव्हा त्यांच्या ड्रायव्हरच्या विनंतीवरून त्यांनी पनवेलकडे जाण्याचे ठरविले आणि कोटींची उड्डाणे घेणाऱ्या गाड्यांतून फिरणारे रामशेठ त्या दिवशी एका ट्रकला हात करून ट्रकमध्ये बसून पनवेल कडे मार्गस्थ झाले.अर्थात त्याची कानोकान खबरही तेव्हा वा त्यानंतरही त्यांनी कोणाला लागू दिली नाही.

महाविद्यालयाचे नॅक करायचे आहे म्हटल्यावर तर, रामशेठजींनी मी मांडलेली प्रत्येक कल्पना नीटपणे समजून घेतली. ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मुक्तहस्ते आपला कुबेर खजिना ओतण्यात त्यांनी कुठलीही कसूर ठेवली नाही. याबरोबरच त्यासाठी वेळोवेळी भेटी देऊन, पाहणी करून त्यांनी कामात जातीने लक्ष घातले.हे करताना जणू त्यांना आपल्या बाकी गोष्टींचाही विसर पडे. अशातच, एवढे तन- मन- धन लावून काम करणाऱ्या रामशेठजींचे नाव महाविद्यालयाला देण्याचा विचार जेव्हा व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथकाका शिंदे साहेब यांनी त्यांच्या गळी उतरविला तेव्हा, रयतचे मा. अध्यक्ष खासदार शरद पवार साहेबांच्या शुभहस्ते उद्घाटन सोहळा संपन्न होणार असल्याचे कळताच लंडनला गेलेले असूनही रामशेठजींचे मन महाविद्यालयाच्या कामांभोवती फिरत राहिले. लंडन येथून आपल्या एवढ्या व्यस्त कार्यक्रमात देखील दररोज मोखाड्याचा कामकाजाचा ते फोनवर आढावा घेत असत. लंडन येथे वास्तव्यात छोटासा अपघात होऊन डोक्याला ११ टाके पडून जखम झालेली असतानाही ते कार्यक्रमाच्या तयारीसाठी मोखाडा येथे डोक्यावरील बँडेजसह हजर झाले. खरे तर कुबेर खजिन्याचे भाग्य लाभलेल्या रामशेठजींना हे सर्व पनवेलला एसी रूममध्ये एका जागी बसून करता येणे सहज शक्य होते. परंतु तसे न करता ते वेळोवेळी मोखाडासारख्या आडवळणी, वैराणगावी येत राहिले.स्वतःच स्वतःच्या मुक्कामाची सोय करून आदिवासी विद्यार्थ्यांना एसी रूम ,पंखे , कुलर, वॉटर प्युरिफायर ,नव्या खुर्च्या, कॅफेटेरिया, विद्यार्थी सुखसुविधा केंद्र अशा सोयी सुविधा देण्यासाठी धावत, धडपडत राहिले.या सर्वांची परिणती म्हणजे मोखाडा कॉलेजला नॅक मानांकनात अभूतपूर्व यश मिळून 'ए प्लस'(A+) ग्रेड (3.43 CGPA) मिळाली. अर्थातच, या आनंदात साखर ओतून पेढे भरवायला आणि सर्वांचे कौतुक करायलाही ते अग्रेसरच राहिले.

रयत शिक्षण संस्था ही अज्ञानामुळे रया गेलेल्या बहुजनांना जाणते करून, स्वाभिमानाने जगण्यास शिकविण्यासाठी उभी राहिलेली संस्था. या संस्थेतूनच ताठ उभ्या राहिलेल्या रामशेठना आदिवासींच्या विकासाचे इंगित मनोमन उमगलेले. त्यामुळे रयतसाठी तर जणू त्यांनी वाहूनच घेतले आहे. कोट्यावधींच्या देणग्या देऊन रयतेमधून नवा माणूस घडविण्याचे कर्मवीरांचे स्वप्न साकार करण्याची त्यांची धडपड आहे. याचाच भाग म्हणजे त्यांच्या आदिवासीं प्रतिच्या कळकळीतून आणि थोर दातृत्वातून पालघर जिल्ह्यातील मोखाडासारख्या दुर्गम व डोंगराळ माळरानावर उभी राहिलेली महाविद्यालयाची दिमागदार इमारत आणि आदिवासींना स्वप्नवत वाटाव्या, एवढेच नव्हे तर, कोणाही पाहणाऱ्याला अचंबित करणाऱ्या ठराव्या अशा दिल्या गेलेल्या शैक्षणिक सोयी सुविधा होत. आदिवासी म्हणून दुर्लक्षित राहिलेल्या या महाविद्यालयाला अल्पावधीत लक्षणीय बनविण्याचे हे कार्य केवळ रामशेठ ठाकूर यांच्या आदिवासी बांधवांप्रतिचा कर्तृत्वभाव आणि त्यातून उमललेला दातृत्वभाव यातूनच घडू शकले. रयत मधून घडलेल्या विद्यार्थ्याकडूनच असा गगनावरी वेलू चढविण्याची बाब अवघ्या रयत परिवारासाठी आनंदाची, अभिमानाची व कौतुकास्पदच. म्हणूनच या महाविद्यालयाचा प्राचार्य आणि या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून मला सांगावेसे वाटते की,

रामायण हे 'काव्य' असल्याचा म्हटलं जातं आणि महाभारत हा 'जय नावाचा इतिहास' असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे अनेकांचा उद्धार करून गेलेल्या पुरुषोत्तम रामाबद्दल माझ्यासारख्या सामान्य माणसाला निश्र्चितपणे सांगता येणार नाही; पण कलियुग म्हणवल्या जाणाऱ्या आजच्या काळातही भातृत्वाचे भान ठेवून दातृत्वासाठी नेहमीच सरसावणाऱ्या रामाबद्दल मी निश्र्चितपणे सांगू शकतो. कारण असा राम थोर देणगीदार किंवा दानशूर रामशेठजी ठाकूर साहेबांच्या रूपात तुमच्या आमच्या समोर प्रत्यक्षात आहे. अडलेल्याला वाट दाखवणे, वाटेत रुतलेल्याला अलगद उचलून घेणे, अडलेल्याचे काम मार्गी लावणं

ही रामशेठजींच्या अंगवळणी पडलेली कृती आहे. त्यांच्या या कृतीने मोखाडा परिसरातील आदिवासींप्रमाणेच अनेकांच्या जीवनाची माती होण्याचे टळून, त्यांना मौल्यवान मोत्यांचे रूप प्राप्त झाले आहे. गरजूंच्या दाराला असे मोत्यांचे तोरण बांधू पाहणाऱ्या रामशेठजींच्या नावाचे तोरण मोखाडा महाविद्यालयाला कायमस्वरूपी बांधले जाणे ही घटना म्हणूनच एखाद्या सणाप्रमाणे आनंददायी, उत्साहवर्धक आहे, असे मला वाटते.

महाराष्ट्राचा जाणता राजा म्हणुन ओळखले जाणारे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांनी रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यांशी चर्चा करून मोखाडा महाविद्यालयास 'लोकनेते रामशेठ ठाकूर' यांचे नाव देण्याचा उचित निर्णय घेतला. महाविद्यालय इमारत उद्घाटन व नामकरण समारंभप्रसंगी भाषण करताना त्यांनी 'रयतचे हितचिंतक' ही रामशेठ ठाकूर यांची ओळख अधोरेखित केली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाची घेतलेली भूमिका, त्यातून शिक्षणाची ज्ञानगंगा आदिवासींसह सर्व घरांपर्यंत पोहोचविण्याचा घेतलेला वसा आणि कमवा आणि शिका या योजनेतून घडलेला 'माजी विद्यार्थी' म्हणुन रामशेठजी याच भूमिकेला पुढे नेत आहेत. चांगल्या कामात प्रोत्साहित करण्याचे रामशेठजींचे धोरण व त्यांचे शैक्षणिक कार्य यांचा आवर्जून उल्लेख करत रामशेठजींचे वेगळेपण निदर्शनास आणून दिले. कमवा व शिका या योजनेत शिक्षण घेऊन व्यक्तिगत जीवनात यश मिळाल्यानंतर रामशेठजींनी सुधारणांची फळं विविध शाखा, विद्यार्थी व स्टाफ यांना दिली. संसदेत खासदार होण्यापासून रामशेठजी वेगवेगळ्या पक्षात फिरत राहिले तरी त्यांची शैक्षणिक भूमिका आणि रयतेविषयीची निष्ठा व दातृत्व कधीही बदललेले नाही हे सांगण्यास शरदचंद्रजी पवार साहेब विसरले नाही. कारण रयत शिक्षण संस्था व तिने चालविलेले शैक्षणिक कार्य यामध्ये 'जिथे कमी तिथे मी' ही रामशेठजींची भूमिका राहिलेली आहे. 'आपण मागितले आणि रामशेठजींनी दिले' हे रामशेठजींचे दातृत्व कायम रयतच्या पाठीशी आहे हा शरदचंद्र पवार साहेबांचा आजवरचा अनुभव असल्याकारणाने मोखाडा महाविद्यालय इमारत उद्घाटन व नामकरण सोहळ्यासाठी ते आवर्जून उपस्थित राहिले.

याचबरोबर मला आवर्जून हेही सांगावेसे वाटते की, विंदा करंदीकरांनी म्हटल्याप्रमाणे, देणाऱ्याचे हात घ्यावे. पण ते जमत नसेल तर निदान, हात देणाऱ्या आधाराला सार्थ ठरवत आपल्या परिस्थितीवर मात करणे आणि परिवर्तन साधणे आपल्याला जमले पाहिजे. रामशेठजींनी हे जगण्यासाठीचं भरभरून ताट आपल्यापुढे ठेवलेलं आहे. आता ते पचवून आणि त्याचा सदुपयोग करणे हे आपल्या हातात आहे. माझा विश्वास आहे की, आमचे आदिवासी विद्यार्थी व सहकारी हे निश्चितपणे करतील. जेणेकरून भविष्यकाळात मोखाडा महाविद्यालय हे केवळ आदिवासी नाही तर ज्ञानाचा, आनंदाचा उजेड निर्माण करणारं, नवकल्पनांच्या स्टार्टअपद्वारे नव परिवर्तन करण्यात अग्रेसर असलेलं, रामशेठजींनी भक्कम पाया रचलेल्या स्वप्नाला प्रत्यक्षात साकारणारं महाविद्यालय असेल.

**– प्राचार्य डॉ. एल. डी. भोर,**
लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा. जि. पालघर.

# माझं महाविद्यालय

आश्रम शाळेतील शिक्षण पूर्ण केलं. मी बारावी पास झालो. इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतचे दिवस संपले. पुढं काय करायचं? माहित नव्हतं, मात्र बारावीत शिकत असताना तेरावी, चौदावी, पंधरावी शिकता येते असं ऐकलं होतं. मित्रांच्या बरोबर कॉलेजला जाण्यासाठी कॉलेज सोधाय सुरुवात केली. तेव्हा कळालं मोखाडला कॉलेज आहे. आम्ही मित्र ॲडमिशन घेण्यासाठी मोखाडला गेलो. तेथे रयत शिक्षण संस्थेचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा हे कॉलेज आहे. तेरावीला ॲडमिशन घेतलं मात्र पुढे लगेच कोरोनाचा संकट आलं आणि ऑनलाईन मोबाईलच शिकवण सुरू झाल. इंटरनेट असलं तर ऐकायचं नसलं तर मोबाईल कडे बघत राहायचं असं चालायचं. तरीही आम्हाला व्हाट्सअप वरती नोट्स मिळायच्या. परीक्षा ही ऑनलाईनच झाली.

खरी मजा आली ती नियमित कॉलेज सुरू झाल्यावर तो पर्यंत पंधरावीला गेलो होतो. परीक्षा मोबाईल वरतीच दिल्या होत्या. वर्गात बसल्यावर वेगळाच आनंद मिळू लागला. माझ्या कॉलेजसाठी नवीन इमारत बांधली जात होती. आपलं कॉलेज मोठं होणार याचा आम्हा मित्रांना खूप आनंद वाटायचा. कॉलेजमध्ये रनिंग, खो-खो, कबड्डी स्पर्धा घेतल्या जात. आमचा कबड्डीचा संघ सर्वात पुढे असायचा तर खो-खो मध्ये सायन्सचा संघ नंबर घ्यायचा. विद्यापीठ स्तरावर सांस्कृतिक कार्यक्रम मध्ये आम्ही सहभागी होतो. विद्यापीठाच्या स्पर्धे साठी आमच्या तारपा डान्सची निवड झाली होती. आम्हा विद्यार्थ्यांचे प्राचार्य साहेबांनी कौतुक केलं तेव्हा लय बेस वाटलं.

मुंबई विद्यापीठाकडून घेतल्या जाणाऱ्या संशोधन प्रकल्पात ही आम्हाला नवीन माहिती मिळत होती. यावर्षी आमच्या कॉलेजमध्ये नॅकसाठी बेंगलोरची समिती भेट देणार होती. त्याची तयारी जोरात चालू होती. आमचे सर आमच्याकडून नाविन्यपूर्ण प्रकल्प करून घेत तसेच आम्हाला नोकरी विषयी सतत माहिती सांगत. कॉलेजमध्ये जिमचं साहित्य आल्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांना व्यायामासाठी सोय उपलब्ध झाली. आम्ही जिम मधील आरशासमोर उभा राहून डंबेलस व वजन उचलायचं. आरशात आपली बॉडी पाहिल्यावर व्यायाम करायला उत्साह वाटायचा. आम्हाला एक चांगली संधी मिळाली. माझ्या कॉलेजने आम्हाला नोकरी मिळावी म्हणून कॉलेजमध्ये डिजिटल साक्षरता केंद्र सुरू केलं. त्यामुळे मला व माझ्या मित्रांना कॉम्प्युटर कोर्सेस करता आले. काही मित्रांना वेगवेगळ्या कंपनीमध्ये नोकरी सुद्धा मिळाली. त्याचा फायदा आम्हाला होतो आहे.

उद्योग व्यवसाय करता यावा म्हणून मासे पाळायचे प्रशिक्षण व गांडूळ खतनिर्मिती प्रशिक्षण सुद्धा दिले जात आहे. आमचं छोट्या इमारतीत भरणार कॉलेज आता मोठ्या दोन इमारती बांधल्या त्यात भरू लागलं. इमारत सुंदर झाल्यामुळे आम्ही सेल्फी काढून डीपीवर ठेवायला लागलो. आमच्या कॉलेजमध्ये संस्थेचे अध्यक्ष आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब इमारत उद्घाटनासाठी आले होते. त्याचवेळी कॉलेजचं नामकरण लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा असं करण्यात आलं. त्या कार्यक्रमासाठी आलेल्या पोलिसांची गर्दी बघून आम्हासनी लय विशेष वाटलं. आपल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी इतकं काम केलं जात आहे हे समजलं. आमच्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर साहेब आमच्यासाठी लय सोयी देतात. नॅक भेट देण्यासाठी आलेले साहेब लोक बघून आम्हासनी लय भारी वाटलं. ते इंग्रजी बोलत, आम्हाला कळत नव्हत मात्र त्यांना आमच्याविषयी आपुलकी वाटते हे जाणवत होते. आमच्या इतिहास विभागाची आम्ही चांगली तयारी केली होती. आदिवासी क्रांतिकारक, इतिहासकार, महापुरुषांचे फोटो लावले होते तसेच जव्हार-मोखाडा परिसरातील पर्यटन स्थळांचे फोटो आणि नाणी व नोटांचे प्रदर्शन केलं होतं. हे सगळं करताना आम्हाला नव्या बाबी शिकायला भेटत होत्या. आमच्या विभागाची अभ्यास सहल नाशिक येथिल त्रीरश्मी लेणी (पांडव लेणी) पाहण्यासाठी गेली होती. तेव्हा खूप मजा आली. तेथे खडकात कोरलेली चित्र व मुर्त्या हे विशेष वाटल्या.

आम्हाला खेळण्यासाठी आता चांगलं ग्राउंड तयार झालं होतं त्यावर हॉलीबॉल, खो-खो, रनिंगचा सराव सुरू झाला होता. कॉलेजमध्ये चांगले स्टडी रूम आहे. मोठा ग्रंथालय आहे. मला कॉलेजमध्ये मिळालेले सर आणि माझे मित्र यांना सोडून जाताना लय दुःख होतंय तरीही कॉलेज सोडून जावं लागत आहे. कारण माझं पदवीच शिक्षण पूर्ण होत आहे. असं सुंदर असणार माझं कॉलेज माझ्या आठवणीतून कधीच जाणार नाही.

**सोमनाथ गावीत**

(टी. वाय. बी. ए.)

# THE SOCIO-ECONOMIC PROBLEMS OF TRAIBAL COMMUNITY OF MOKHADA TALUKA

The Tribal Community in India is known as Scheduled Tribes or ST under Article 366. In India there are 212 tribes of 14 States. Out of 14 states, Maharashtra state is one of them. Mokhada taluka is the tribal community taluka of Palghar district, Maharashtra. Mokhada Taluka of Palghar district has total population of 83,453 as per the Census 2011. Out of total populations of Mokhada taluka 76842 (92.07%) people are tribal community. The main object of this article is to study the socio-economic conditions and problems of tribal community of Mokhada taluka. The study is needful for understand the socio-economic conditions and problems of tribal community of Mokhada taluka. With the help of this study, we can suggest some remedies to local nagar panchyayat for solves difficulties of this tribal community.




Mokhada Taluka of Palghar district has total population of 83,453 as per the Census 2011. Out of which 41,691are males while 41,762 are females. In 2011 there were total 17,789 families residing in Mokhada taluka. The Average Sex Ratio of Mokhada taluka is 1002. As per Census 2011, all of the population of Mokhada taluka lives in ruaral areas. The sex ratio of Mokhada taluka is 1002. The total literacy rate of Mokhada taluka is 56.48%. The male literacy rate is 53.7% and the female literacy rate is 39.4% in Mokhada taluka. There are 59 villages in Mokhada taluka. Mokhada taluka is the tribal community taluka of Palghar district, Maharashtra. Out of total populations of Mokhada taluka 76842 (92.07%) people are tribal community.

The Socieo-Economic Problems of Traibal Community of Mokhada Taluka are as follows,

**Literacy Rate:**

Education is the main tools of development of any society but if we think about the literacy rate of Mokhada taluka, it is very poor. Average literacy rate of Mokhada Taluka in 2011 were 56.48%. Out of which, male and female literacy were 65.49% and 47.56% respectively. Total literate in Mokhada taluka were 38,841 of which male and female were 22,386 and16,455 respectively

**Poverty :**

Poverty of the main problem of the tribal community of the Mokhada taluka. Majority of people of Mokhada taluka living in below poverty line. Due to low rate of literacy Mokhada talukas people can't get any types of job. Peoples are engaged only some temporary job like, agricultural labour, fishing, hunting etc. Unemployment is the main problems of tribal community of Mokhada taluka.

**Health Related Issues :**

Rural poor people faced so many problems related to the health like, malnutrition, deficiency of calcium and iodine. Due to high rate of alcoholism liver dysfunction, leprosy are common disease present among the trails of Mokhada taluka.

**Cultural and Religious Problems:**

Unnecessary cultural and religious

activities disturb to the tribals and pulls towards ineptiness. Therefore, suicide cases, tention, stress, familiar disterbance takes place in these communities.

**Land Problems:**

The people of Mokhada talukas totally depends on agriculture sector. Tribal's history is full of land alienation and colonialism. Moneylenders and zamindars as well as traders are exploited to the tribals in various perspectives.

**Women related Issues:**

If we think about the development planning of the country, it should always start with the women. Because more than others women face so many problems like unemployment, disparity, backwardness, harassment etc. Tribal women of Mokhada taluka also face so many problems related to family harassment, wage rate problem, secondary status in society etc.

**Problems of Exploitation of Childs:**

Child abuse and exploitation are very dangerous problem in tribal area of Mokhada taluka. Children are neglected and avoided from their basic human rights. In spite of education, they involve various types of dangerous work with their parents.

**Problems of Administration and Government:**

After independence of country for the development of tribal community government has planed various schemes. But expected success could not get and still there is need of time to frame developmental policies for them. While perusing the study it is notice that very few officers and employees are interested to give their services in remote tribal region.

**Recommendations:**

Further suggestions can be given to improve the socieo-economic conditions of Mokhada talukas tribal community, are as follows,

1. In order to change the socieo-economic status of the people of Mokhada taluka, the level of tribal community education in the place has to be increased.
2. Addiction is high among the people in the tribal community. The government should special efforts for the get rid of the addiction.
3. For the socio-economic empowerment of the women in tribal community of Mokhada taluka government should developed the self-help group movement in tribal areas of Mokhada taluka.
4. Industrialization is essential for job creation in the tribal area of Mokhada taluka.
5. For the better health of tribal people government should established the government hospital in tribal place of Mokhada taluka.
6. Superstitions need to be eradicating from the people in the tribal community of Mokhada taluka and for that there is need to be special effort by government.
7. Government should make well planed road in tribal area of Mokhada taluka for go to the market to sell goods.

The main problems of Tribal communities of Mokhada taluka are illiteracy, unemployment, land related problems, child and women problems, health related problems, lack of technology etc. For the development of the tribal society of Mokhada taluka there should be need to state government take some special efforts.

**Dr. Yashwant H. Ulvekar**
Department of Economics

# ग्रामीण भारतातील ई-कॉमर्स




ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची संख्या आजही मोठ्या प्रमाणावर आहे. समाजाच्या गरजा भागविण्यासाठी व्यापार व सेवा क्षेत्राचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. व्यापार व सेवा क्षेत्राचा विकास होत असताना माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. भारतामध्ये ई–कॉमर्सची वाढ सतत आणि सकारात्मक बाजूने होत आहे. जेव्हा आपण भविष्यातील संभाव्य वाढीकडे पाहतो तेव्हा असे दिसते की भारताच्या ग्रामीण भागात ई–कॉमर्सचा विस्तार आगामी काळात अजूनही खूप मोठ्या प्रमाणावर होणार आहे. ग्रामीण क्षेत्रात इच्छुक असणाऱ्या ई–कॉमर्स उद्योजक आणि व्यवसाय उत्साहींसाठी भरपूर वाव आणि संधी भारतामध्ये उपलब्ध आहेत.

स्वातंत्र्यानंतर, भारताच्या भौगोलिक प्रदेशात व्यावसायिक हेतूने बनवलेल्या उत्पादनांच्या ग्रामीण वितरणात प्रगती करण्याच्या बाबतीत काहीही विशेष बदल झालेले नाहीत. भारताच्या ग्रामीण भागात व्यावसायिक उपक्रम आणि ई-कॉमर्स कंपन्यांचा वेगवान विकास करणे ही काळाची गरज बनलेली आहे.

भारत हा एक कृषि प्रधान देश आहे. एखाद्या राष्ट्राची कृषी क्षमता सामर्थ्यशाली असणे हा एक महत्त्वाचा घटक असतो जो त्या देशाच्या आर्थिक वाढीस उत्तेजन देतो. कृषी–आधारित क्षेत्राचा विकास हे प्रमुख विकास पॉवरहाऊस आहे, जे गेल्या काही वर्षांत झालेल्या आर्थिक वाढीचा एक शक्तिशाली स्त्रोत आहे. IAMAI नुसार, भारताने या बाबतीत दुसरा क्रमांक मिळवला आहे. भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये इंटरनेटवर सक्रिय असलेल्या वापरकर्त्यांची संख्या आज खूप मोठी आहे. ही संख्या शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर आहे. डिजिटल खेडेगावाची संकल्पना सध्या विकसित होत आहे. डिजिटल गावांच्या अधिक व्यापक परिस्थितीच्या संदर्भात अनेक सरकारी उपक्रमांसह इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

**ग्रामीण भारतातील ई–कॉमर्सची व्याप्ती**

ई–कॉमर्सने ग्रामीण समाजामध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणल्या आहेत आणि भारताच्या ग्रामीण भागात अस्तित्वात असलेल्या समाजांच्या सुधारणेसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी काही गोष्टी बदलल्या आहेत. भारतामध्ये ग्रामीण भागातील इंटरनेट वापरकर्ते साधारणपणे ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे असतात, म्हणूनच तरुणांमध्ये, त्यांच्या आवाहनानुसार अधिक फायदेशीर उत्पादने मिळवण्याची संधी आहे, ज्यामुळे त्यांची जीवनशैली बदलते आणि त्यांचा सौंदर्य आणि ब्रँड तयार करण्यासाठी विश्र्वास देखील विकसित होतो. ही एक नवीन संधी उपलब्ध होत आहे. ग्रामीण भारतातील ई–कॉमर्स हस्तकला सारख्या लघुउद्योगांना तसेच किरकोळ विक्रेत्यांना त्यांची उत्पादने ऑनलाइन मिळविण्यात मदत करण्यासाठी आणि भविष्यात त्यांच्या व्यवसायाला भरभराटीचा मार्ग देण्यासाठी नाविन्यपूर्ण संधी निर्माण होते. भारतातील ग्रामीण भागात इंटरनेट सुविधांच्या विस्तृत विस्तारामुळे स्थानिकांना त्यांची उत्पादने त्यांच्या सोयीच्या ठिकाणी विकण्यासाठी आधार मिळाला आहे. भारताच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करून एक मोठा ग्राहक आधार तयार करण्यासाठी ई–कॉमर्स कंपन्यांना भरपूर वाव निर्माण झाला आहे.

**ग्रामीण भारतातील ई–कॉमर्स– एक अभूतपूर्व वाढ**

देशभरातील इंटरनेट वापरकर्त्यांच्या वेगाने वाढणाऱ्या संख्येमुळे भारतातील ग्रामीण भागातील ई–कॉमर्सची व्याप्ती वाढत आहे. लोक ऑनलाइन माध्यमांना प्राधान्य देत आहेत कारण विक्रेत्यांना त्यांची उत्पादने त्यांच्या घराबाहेर वितरित करता येतात व ग्राहकाला ती सहज उपलब्ध करून घेता येतात. या व्यतिरिक्त, किरकोळ विक्रेत्यांना त्यांच्या उत्पादनाचे ऑनलाइन स्वरूप असेल, ज्यामुळे एक मोठा ग्राहक आधार तयार होईल.

इंटरनेटच्या सर्व व्याप्तीमुळे, ग्रामीण लोक त्यांच्या जागी ऑनलाइन सहाय्याचा मोठा फायदा घेत आहेत, ज्याने त्यांची जीवनशैली बदलली आहे. जे लोक ग्रामीण भागामध्ये काम करण्यास इच्छुक आहेत आशा लोकांसाठी रोजगाराच्या संधी जास्त निर्माण झालेल्या आहेत. ग्रामीण भारतातील तसेच शहरी भागात ई–कॉमर्सची भरभराट होत असलेली प्रगती अतुलनीय आहे. इंटरनेट वापरणारे सक्रिय ग्राहक फॅशन, ब्रँड, आराम, किंमत आणि बरेच काही वस्तू व सेवांच्या विस्तृत पर्यायांनी संपन्न आहेत.

**– रमेश शिद**

**(टी. वाय. बी. कॉम.)**

# भारतातील विम्याचे भविष्य

भारतीय विमा क्षेत्रामध्ये अनेक बदल झाले आहेत आणि आज सर्वात वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांपैकी एक म्हणून विमा क्षेत्राकडे पहिले जाते. सध्याच्या उद्योगाच्या जलद डिजिटलायझेशनला गती दिली आहे म्हणून त्याची आज मागणी वाढली आहे. नवीन उत्पादनांचा विकास आवश्यक आहे. शिवाय, उद्योगाच्या उत्क्रांतीला कारणीभूत असलेल्या बाह्य घटकांमुळे व्यत्यय आल्याची शक्यता नाकारता येत नाही.




### विमा उद्योगाची उत्क्रांती

भारतातील विम्याचा इतिहास खोलवर रुजलेला आहे आणि हा प्रवास २०० वर्षांचा आहे. व्यवसायाच्या दृष्टीने, जीवन विमा १८१८ मध्ये जेव्हा ओरिएंटल लाइफ इन्शुरन्स कंपनीने कोलकत्ता येथे सुरू केला. त्या काळात बाजारावर विदेशी विमा कंपन्यांचे वर्चस्व होते. त्यानंतर, १९१२ मध्ये, भारतीय जीवन विमा कंपनी ही भारतातील जीवन विम्याचे नियमन करणारी पहिली वैधानिक संस्था म्हणून उदयास आली. विमा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण जानेवारी १९५६ मध्ये एलआयसी (लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन) च्या उदयासह झाले, ज्या व्यवसायाने नंतर २४५ भारतीय आणि काही परदेशी विमा कंपन्यांना सामावून घेतले. १९९० च्या दशकापर्यंत, विमा क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी पुन्हा उघडेपर्यंत आणि बदल दिसून येईपर्यंत एलआयसीची बाजारात मक्तेदारी होती.

मल्होत्रा समितीच्या शिफारशींसह, IRDAI (विमा नियामक आणि विकास प्राधिकरण) २००० च्या सुरुवातीस विमा उद्योगाचे नियमन करण्यासाठी एक वैधानिक संस्था म्हणून समाविष्ट करण्यात आले आणि यामुळे उद्योगाचे चित्र अपरिवर्तनीयपणे बदलले. गेल्या दोन दशकांमध्ये, भारतातील विमा बाजाराने प्रभावी वाढ अनुभवली आहे, कारण खाजगी क्षेत्राचा वाढलेला सहभाग, वितरणाची उत्तम क्षमता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ आहे. या क्षेत्राचे उदारीकरण झाल्यापासून विमा क्षेत्राने कधीच मागे वळून पाहिले नाही आणि तो आता भारतातील सर्वात स्पर्धात्मक आणि विकसनशील उद्योगांपैकी एक आहे. IRDAI नुसार, आज ३४ सामान्य विमा कंपन्या आणि २४ जीवन विमा कंपन्या आहेत.

१९७२ मध्ये जनरल इन्शुरन्स कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले , ज्यामध्ये १०७ विमा कंपन्यांचे गटबद्ध आणि चार कंपन्यांमध्ये विलीनीकरण करण्यात आले. त्यामध्ये नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि., द न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि.यांचा समावेश आहे.

### विमा व्यवसायातील आव्हाने आणि संधी

भारतातील विमा उद्योगाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. भारतामध्ये शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण लक्षणीय आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार, सुमारे ६५% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागात विम्याचे खरेदीदार आणि मध्यस्त तुलनेने कमी असल्याने ग्रामीण भागामध्ये काही समस्या उद्भवतात. भारतात विमा क्षेत्र विकसित न होण्याच्या मुख्य कारणांमध्ये अपुरी विमा जागरुकता, उत्पादनाच्या आकलनातील अंतर आणि खरेदी केलेल्या विम्याच्या गुंतवणुकीवरील परतावा मूल्य याचा समावेश होतो. यामुळे ग्रामीण भागात विम्याचा विकास पुरेपूर झालेला नाही.

कोविडने आरोग्य विम्याबद्दल जनजागृतीमध्ये वाढ केली, परिणामी विमा पॉलिसी खरेदीमध्ये वाढ झाली. इतर विमा उत्पादनांमध्ये मात्र अजूनही मंद वाढ होत आहे. IRDAI च्या वार्षिक अहवालानुसार २०२१-२२ मध्ये भारतात विमा घेणाऱ्यांचे प्रमाण ४.२ टक्के होते, जे २०२०-२१एवढेच राहिले. भारतात, विम्याच्या प्रवेशास चालना देण्यासाठी, भांडवलाचा प्रवाह वाढविण्यासाठी, मूल्यांकनास चालना देण्यासाठी व व्यवसाय सुलभ करण्यासाठी अनेक नियामक बदल अंमलात आणले जात आहेत. परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक , सामान्य विमा व्यवसाय दुरुस्ती विधेयक आणि उद्योगाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल वितरित करणे

ही विमा व्यवसाय वाढीची काही प्रमुख उदाहरणे आहेत. विमा बाजाराला लक्ष्य करणाऱ्या खाजगी व्यवसायीक, नवीन तंत्रज्ञान आणि नवीन वितरणाच्या पद्धती , नवीन वितरण पद्धतीचा वापर करून उद्योगाचा दीर्घकालीन विस्तार सुलभ झाला आहे.



**तंत्रज्ञानावर आधारित विम्याचा उदय**

भारताच्या विमा उद्योगाने तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा स्वीकार केला आहे. तांत्रिक प्रगती असूनही, विमा उद्योगात अजूनही मानवी स्पर्शाची आवश्यकता आहे. उत्पादने जटिल असल्याने, ग्राहकांना उद्योगातील तांत्रिकता किंवा शब्द समजू शकत नाहीत. ग्रामीण रहिवाशांचा कल कमी तंत्रज्ञान जाणण्याचा असतो, त्यामुळे जाणकार एजंट्सची स्पष्ट गरज आहे जे ग्राहकांना त्यांच्या पॉलिसींच्या गुंतागुंतींमध्ये मार्गदर्शन करू शकतील आणि ते पुरेशा प्रमाणात कव्हर केले जातील याची खात्री करू शकतील. याव्यतिरिक्त, ते उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या पॉलिसींबद्दल सल्ला देऊ शकतात आणि ग्राहकांना त्यांच्या गरजांसाठी सर्वात योग्य पॉलिसी निवडण्यात मदत करू शकतात. त्यामुळे मानवी स्पर्शासह तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणाने उद्योगाची वाढ निश्चितच होईल.

**भविष्यातील बदल**

भारतीय कायद्यातील गरजेनुसार झालेले बदल, तांत्रिक प्रगती, सरकारी समर्थन आणि लोकांमधील वाढती जागरूकता यामुळे भारतातील विमा उद्योगाचे भविष्य आशादायक दिसते. भारतातील विमा व्यवसाय बाजारपेठेत नवनवीन योजना , सुयोग्य वितरण व्यवस्था, चांगले विमा परतावा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानातील बदल यासारखे नवीन ट्रेंड येऊ घातलेले आहेत. सध्या भारतीय लोकांचे उत्पन्न, क्रयशक्ती, आर्थिक काटकसर झपाट्याने वाढते आहे. वित्तीय बाजारामध्ये विमा उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतो. विमा कंपन्या, त्यांच्या प्रिमियममधून जमा झालेल्या निधीसह, अर्थव्यवस्थेच्या वाढीस हातभार लावतात. संघटित विमा प्रणाली मधील कुटुंबाला, व्यवसायाला, समुदायाला, उद्योग आणि व्यापारासाठी असंख्य प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदे मिळतात. परिणामी, भारतातील विमा क्षेत्राच्या विस्तारामुळे जीडीपी वाढीस मोठा हातभार लागेल.

**कु. कामडी भारती पांडुरंग**
**(एस. वाय. बी. कॉम.)**

# रखाण : मोखाडा तालुक्यातील एक गुहा

महाराष्ट्रात लेणी, किल्ले, गुहा बनविण्याचा इतिहास हा दुसरे शतक ते बाराव्या शतकापर्यंतचा आहे. म्हणजे साहजिकच या गुहेला पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. त्यापैकीच कुंडाचा पाडा, बेरिस्ते, जामद्याचापाडा आणि चास या चार गावांच्या मधोमध का बनवली असावी? या गुहेच्या शेजारील गावातील व आजूबाजूच्या गावातील लोक या गुहेला रखाण या नावाने ओळखतात.

या गुहेजवळ जाण्यासाठी कुंडाचापाडा, बेरिस्ते, चास आणि जामद्याचापाडा या चारही गावावरून जाता येते. जर चास वरून गेल्यावर खाली उतरून गेल्यावर एक नदी लागते व नदीपलिकडे डोंगर लागतो. त्या डोंगराच्या मध्यभागी गेल्यावर ही गुहा आहे. चारही गावातून गुहेजवळ जाण्यासाठी तितकाच वेळ लागतो.

सुरवातीस गुहेजवळ गेल्यावर गुहेचा ओटा लागतो आणि ओट्याच्या वरच्या बाजूस एक गोलघुमट दरवाजा आहे. त्या दरवाज्यातून आत गेल्यावर एक सरळ मार्ग लागतो. तो डोंगराच्या वरच्या शिरेवर जाऊन निघतो व दुसरा मार्ग सरळ शंभर मीटर एवढा आहे. पण तो डोंगरामध्येच खडक कोरून तयार केलेला आहे. त्या मार्गाला ठिकठिकाणी खडक कोरून देवी देवतांच्या मूर्त्या कोरल्या आहेत. पण त्या दोन नंबरच्या मार्गाला जाण्यासाठी एक निमुळता गोल दरवाजा आहे. त्या गोल दरवाज्यातून जो व्यक्ती आत शिरेल तोच आतल सर्व काही बघू शकतो. पण आतमध्ये पूर्ण अंधार असल्यामुळे बॅटरी न्यावी लागते व दोन नंबरच्याच मार्गावरून २० मीटर पुढे गेल्यावर तिसरा मार्ग लागतो. त्या मार्गात एखादा व्यक्ती खाली पडला तर निघणे मुश्किल आहे. पण जो एक नंबरचा मार्ग आहे त्या मार्गाच्या दरवाजावर पावसामुळे दगड येऊन बसल्यामुळे त्या मार्गात जाता येत नाही. मात्र जो दोन नंबरचा मार्ग आहे. तो मार्ग आपण आजही पाहू शकतो. अशी या गुहेची रचना आहे.

**तुळशीराम नंदू दिघा**
**वर्ग :** एफ.वाय. बी.ए.

# कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स हे १९ व्या शतकातील एक जर्मन अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. त्यांनी अनेक विषयांवर लिखाण केले पण त्यांचे वर्गसंघर्षावरील लिखाण हे जास्त प्रसिद्ध आहे. फ्रेडरिक एन्जेल्स प्रमाणे मार्क्सने देखील, तत्कालीन राजकीय लढ्यांमध्ये भाग घेतला. कार्ल मार्क्स यांनी 'दास कॅपिटल' या ग्रंथाचा पहिला खंड इस. १८६७ मध्ये प्रसिद्ध केला. कार्ल मार्क्स यांच्या विचारांची प्रियता सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर कमी झाली असली तरी ते विचार शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कामगार लढा यामध्ये अजूनही लोकप्रिय आहेत. मार्क्स यांचे विचार अनेक कम्युनिस्ट राजे आणि राजकीय चळवळीमध्ये अजूनही आदर्श मानले जातात ते वर्ग संघर्षाचे प्रणेते होते.

कार्ल मार्क्स यांचा जन्म जर्मनीतील ट्रायर या गावी झाला. त्यांचे वडील- हाईनलँड येथे वकिलीचा व्यवसाय नंतर त्यांनी बर्लिन विदयापीठात डॉक्टरेट पदवी मिळवण्यासाठी प्रवेश घेतला. इ.स. १८४१ मध्ये त्यांचा प्रबंध मान्य होऊन त्यांच्या नावामागे 'डॉक्टर' ही उपाधी लागली. मार्क्स यांचा सामाजिक चळवळीवरील प्रभाव अतुलनीय आहे. मार्क्स स्वत: एक उत्कृष्ट अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. जर्मनीतील जेना विदयापीठामध्ये कायदा आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर, पत्रकार म्हणून काम सुरू केले. कार्ल मार्क्स यांनी इस् १८४८ रोजी कम्युनिस्ट मॅनिफेस्टोत त्यांनी कामगार-मजूर वगन क्रांती करून कम्युनिस्ट समाज स्थापन करावा असा विचार मांडला. मार्क्स यांनी स्वत: समाजवादाची स्थापना केली नसली तरी समाजवादावर त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव आहे त्यांच्या स्फोटक विचारांमुळे त्यांना पॅरिस, ब्रसेल्स आणि नंतर लंडन येथे हद्दपार करण्यात आले. फ्रेडरिक एन्जेल्स यांनी मार्क्स यांच्या टिपणांच्या आधारे दास कॅपिटलचे उर्वरित दोन खंडू लिहून प्रसिद्ध केले.

कार्ल मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्य सिद्धांत, वर्गसंघर्ष, राज्यविहान व वर्गविहान समाज या साऱ्यांचा समावेश होतो. धर्म दुबळ्या माणसाला भ्रामक सुख, अभ्यासात्मक सुख देतो. त्याची गरज आहे, भ्रम आहे. धर्माच्या रूपाने व्यक्त होणारे दुःख हे एकाच वेळी खऱ्या दुःखांचे प्रकृत रूप असते आणि त्याच वेळी तो खऱ्या दुःखाचा निष्प्रही असतो. धर्म हा दबलेल्यांचा, दीनदुबळ्यांचा आवाज असतो. धर्म हृदयशून्य जगाचे हृदय असते. धर्म हा निरूत्साही परिस्थितीतला उत्साह असतो. धर्म लोकांची अफू आहे. खरे सुख न देता, तो अफूसारखी गुंगी देतो.

उत्पादन व्यवहार, उत्पादनशक्ती, उत्पादन संबंध त्यातील अंतर्विरोध, खाजगी मालकी, शासन संस्था, विचारसरणी, क्रांती इत्यादी मूलभूत संकल्पनांचा विचार करून मार्क्सने मानवाचा उत्पादन व पुनरूत्पादनाचा व्यवहार, त्यातील उत्पादनशक्ती व उत्पादनसंबंध यांचे नाते यांच्या आधारे इतिहासाचा तसेच त्यांच्या काळातील वर्तमानाचा अभ्यास केला. अभ्यासातूनच त्याने निष्कर्ष काढला की मानवी इतिहास हा वर्गलढ्याचा इतिहास आहे. व उत्पादन साधनांवरची भांडवली खाजगी मालकी हे आजच्या सर्व प्रश्र्नांचे मूळ आहे. हेगेलच्या म्हणण्यानुसार, मानवी मनात एक विचार निर्माण होतो (वाद), त्याच्यातील उणिवा किंवा अंतर्विरोध म्हणजे प्रतिवाद असतो. वाद व प्रतिवादाच्या संघर्षत्मक समन्वयातून राहते 'जाणिवा' या इतिहासाच्या चक्रातील प्रेरक घटक असतात असे हेगेलचे म्हणणे होते. मार्क्सला मात्र 'जडद्रव्य' किंवा 'पदार्थ' अधिक महत्त्वाचे वाटले.

राज्याचा आधार पाशवी शक्ती हाच असतो. वर्गीय हितसंवर्धनाच्या गरजेतून शोषकांनी राज्याची निर्मिती केली. सर्वांचे कल्याण हा कधीच राज्याचा हेतू नसतो. राज्ये सर्वोच्च कल्याणासाठी नसल्यामुळे ती विलयाला गेलीच पाहिजेत. मार्क्सच्या मते हातांनी करायचे काम हे बौद्धिक कामापेक्षा अधिक महत्त्वाचे असते.

एकदा समाजाची आर्थिक संरचना कळाली की समाजातील इतर संरचना सहजपणे समजून घेता येऊ शकतील असे मार्क्सला वाटते. इतिहासपूर्व अवस्था, गुलाम बाळगणारा समाज, सरंजामशाही, भांडवलशाही आणि साम्यवाद अशा इतिहासाच्या पाच अवस्था मार्क्सने सांगितलेल्या आहेत. भांडवलदार ज्याप्रमाणे माणसाचे शोषण करतात, त्याचप्रमाणे निसर्गाचेही शोषण करतात. नफा कमावणे हा त्यांचा एकमेव हेतू असल्याने नफा कमावण्यासाठी ते माणसाचे शोषण करतात, त्याचप्रमाणे ते निसर्गाचेही शोषण करतात. शासन संस्था, राजसंस्था हे प्रस्थापितांच्या हातामध्ये ठेवून समाजाचे परिवर्तन करता येणार नाही.

भांडवलशाही समाजव्यवस्था ही प्रत्येक समाज रचनेसारखीच जिवंत शरीरासारखी रचना आहे. तिचा विकास तिच्या अंतर्गत स्वभाव नियमानेच होतो. नफा मिळवण्याची प्रवृत्ती अपयशी होऊ लागली, नफा कमी होऊ लागला म्हणजे संबंध समाजरचना ढकमकते, भांडवलशाहीचा नाश होतो आणि तिच्या ठिकाणी अधिक उच्च दर्जाच्या समाज संस्थेची स्थापना होते. ब्रिटिश कामगार वर्गाचे दैन्य व दुर्दशा मार्क्स पाहिली आणि मोजली आणि त्यावरून भविष्यवाद काढला की या भांडवलशाहीच्या खाजगी संपत्तीवर खिळा ठोकला जात आहे आणि ज्यांनी लुटले ते लुटले जाणार आहेत पीडित जनतेला फार मोठा आशावादी दृष्टिकोन देण्यात मार्क्स हा यशस्वी झाला.

**- वारघडे मनोज भागीरथ**

**(एम. ए. II)**

# The Indian Scientists

Ever since vedic times, science and Scientific. inquiry have been integral to Indian Intellectual endeavors. It is widely known that Indian mathematicians invented the Concept of Zero and the decimal System of numbers. The Indian medical system of Ayurveda reached great heights In vedic India, its methods including surgery, and plastic Surgery as well as preventive health maintenance. The Ayurvedic texts of chakraka and Sustiruta are still in use today, as are the works of the ancient Indian Mathematicians Aryabhata and Bhaskara Modern India has produced a number of eminent scientists who have made major contributions to science. Following are examples of Some Todian Scientists

**Har Gobind Khorana** was an Indian American bio-Chemist. He was born on 9th January 1922 in Raipur, Punjab He shared the 1968 Nobel prize for physiobay or medicine with marshall W. Nirenberg, and Robert W Holley for research that showed the order of nucleotides in nucleic acids, which carry the genetic code of the cell, and control the cell's Synthesis of proteins: Khorano and Nirenberg were also awarded, the louisa Gross Horwitz prize from columbia university in the same Year.

**Birbal Sahni** was an Indian paleobotanist born on 14th November 1891. He studied the fossils of Indian subcontinent. He also took an interest in geology and orchacology. He was the founder of Birbal Sahni, Institute of palaeobotany at Lucknow in 1946. His major contributions were in the Study of the fossil plants of India and in plant evolution.

**Sir Jagadish Chandra Bose** born on 30$^{th}$ November 1858. He was a plant physiologist and physicist whose invention of highly Sensitive instruments for the detection ofs minute responses by living organisms to external. Stimuli enabled him to anticipate, the parallelism between animal and plant tissues noted by later biophysicist. His books include Response in the living and Non-living (1902) and The Nervous Mechanism of plants (1926).

**C.V. Raman :** chandrasekhara Venkata Raman), who was born on 7th November 1888 in Tiruchirappalli in Southern India. His father was a lecturer in mathematics and physics. So that from the first he was immersed in an academic atmosphere. His work was influential in the growth of science in India? He got the Nobel prize for physics in 1930 for the discovery that when light transverses a transparent. material, some of the light that is deflected changes in Wavelength. This phenomenon is now called Raman Scattering and is the result of the Raman effect.

**Homi Jehangir Bhabha** born on 30 October 1909 to a wealthy family in mumbai. He gained international prominence after deriving a correct expression for the probability of scattering positions by electrons, o process I now known as Bhabhia Scattering. His major contributions included work on Compton scattering, R- process and the advancement of nuclear physics: He was awarded the adams prize (1942) and padma Bhushan (1954). He died in the crash of air India Flight 101 in 1965 at the age of 56.

**Yogesh B. Warghade**
(FY.B.Sc.)

# स्वराज्याचे साक्षीदार किल्ले

महाराष्ट्र हा डोंगरांचा देश.

गोविंदाग्रजांनी महाराष्ट्राचे वर्णन कसे केले आहे?

*'राकट देशा, कणखर देशा,*
*दगडांच्या देशा, नाजुक देशा,*
*कोमल देशा, फुलांच्याही देशा'*

अशा या राकट देशाचा प्रतिनिधी म्हणजे सहयाद्री. सहयाद्रीत कोठेही उभे राहून नजर फिरवली तर, दर चार-दोन शिखरांआड एखाद शिखर तटबुरुजांचं शेलापागोटे चढवून उभं राहीलेलं आढळत यातील बहुतेक दुर्गानी श्रीशिवछत्रपतींची चरणधूक आपल्या मस्तकी धारण केली आहे. शिवस्पर्शाने पावन झालेली ही महाराष्ट्राची धारातीर्थे आहेत. या गड- कोट- किल्ले आणि दुर्गामधून इथे देशीचे पुत्र ताठ मानेने वावरले आहेत. या बळीवंत दुर्गाच्या आधारावरच शिवरायांनी परकीय आक्रमक, धर्मांध सत्ताधीशांना नामोहरण केलं आणि

*या भूमंडळाचे ठायी, धर्मरक्षी ऐसा नाही*
*महाराष्ट्र धर्म राहिला काही, तुम्हा कारणे*

हे समर्थ वचन सार्थ केले.

## किल्ला म्हणजे काय ?

जिथे राहुन शत्रूच्या हालचालीवर नजर ठेवता येते. वेळप्रसंगी शत्रूवर हल्ला करता येतो. आणि नैसर्गिक किंवा मुद्दाम बांधकाम करून दुर्गम केलेल्या ठिकाणी राहील्यामुळे आपले संरक्षण होते याला किल्ला असे म्हणतात. किल्ले ही लढायाची ठिकाणं रणक्षेत्रांचे मानकरी म्हणजे स्वातंश्रात्मा सहयाद्रीची आभूषणेच आहेत. या किल्ल्यांचा परीचय महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येकाने करून घ्यायला हवा. सुट्टीच्या वेळी या किल्ल्यांना भेट दयायलाच हवी.

## किल्ल्यांचे प्रकार :

रामायण, महाभारत, अग्नीपुराण, कौटिल्याचे अर्थशास्त्र, ऋग्वेद, अथर्ववेद, वराड मिडिशची बृहत्संदीता मनुस्मृती अशा जुन्या ग्रंथात किल्ल्यांचे महत्व दिलेले आढळते. म्हणजे त्याही काळात आपल्या देशात किल्ले होतेच.

*प्रथमं गिरीदुर्गंच, वनदुर्ग द्वितीयकम*
*तृतीयं गव्हर दुर्ग, जलदुर्ग चथुर्तकम*
*पंचमं कदमं दुर्ग, वठं स्थान्मिश्रकं*
*सप्तमं ग्रामदुर्ग स्थात कोष्टदुर्ग*
*तथाष्टकम्- देवज्ञ विलास, लाला लक्ष्मीधर*

लाला लक्ष्मीधराने देवज्ञविलास या ग्रंथात किल्ल्यांचे आठ प्रकार सांगितले आहेत. सातील सर्वात उत्कृष्ट गिरीदुर्ग म्हणजे डोंगरी किल्ला, त्यानंतर वनदुर्ग म्हणजे अख्यात असलेला किल्ला. गव्हरं म्हणजे एखादया गुठेचा उपयोग किल्यासारखा करता आला तर तो तिसऱ्या श्रेणीचा किल्ला मानला जातो. चौथ्या दर्जाचा किल्ला म्हणजे जलदुर्ग - पाण्यातला किल्ला. कर्दमं म्हणजे चिखलात किंवा दलदलीच्या प्रदेशातील किल्ला हा पाचव्या प्रतीचा तर मिश्रपद्धतीचा किल्ला म्हणजे सहाव्या प्रतीचा किल्ला. संपूर्ण गावकुस किंवा गावाभोवती कोट असेल तर तो सातव्या प्रकारचा किल्ला व एखादा नुसता कोट किंवा गढी हा आठव्या प्रकारचा किल्ला.

सर्वसाधारणपणे डोंगरावर असणारा गिरीदुर्ग, समुद्रात बेटात असणारा जंजिरा किंवा जलदुर्ग, जमिनीवर असणारा भुईकोट किंवा स्थळदुर्ग असे किल्ले आपल्याला माहीत असतात.

**तुषार संतोष पाटील**
**एम. ए.** (II)



# Wonder of Science

Science was not so developed as it is today. People were solely dependent on the mercy of God. But, today the situation has got completely changed. Now the wonders of science are visible everywhere. Our present civillization may be called a successive development of science. Science has removed superstitions. It has removed suffering.

The development of science has made our life secured. In the past, people suffered from various fatal diseases. But now the development of medical science made diseases curable There was a time when countless people died of plague and cholera. They died uncared. These diseases were incurable and then. But the situation has changed now. Lots of medicines and methods of treatment are available for various diseases. X-ray machine and other tools which are better option of treatment is really a wonder of science.

Science has played a remarkable role in the field of transport also. A few hundred years ago traveling was a difficult task. People often traveled on foot or on the horseback. But today science has developed the fastest means of traveling. motorbike, car, jeep, bus, truck, train, ship and aeroplane have made travelling very easy and comfortable. All these are the gifts of Science.

The invention of wireless radio, telephone, computer and television has solved the problems of time. and distance. Now the Journey to mars and the landing on the moon are possible due to the wonder of Science.

**- Ashvini Laxman Khutade**
(S.Y. B.Sc.)



# CONSTITUTION OF INDIA




The constitution of india is the supreme law of India. The documents lays down the framework that demarcates fundamental political code, structure, procedures, powers, and duties of government institution and sets out fundamental rights directive principles, and the duties of citizens. It is the longest written national constitution in the world.

It parts constitutional supermacy (not parliamentary supermary, since it was created by a constituent assembly rather than parliament and was adopted by its people with a decleration in its preamble parliment override the constitution.

It was adopted by the constituent assembly of India on 26th November 1949 and became effective on 26th January 1950. The constitution replaced the Government of India Act 1935 as the country. Fundamental governing documents, and the dominion of India became the Republic of India. To ensure constitutional autochthony, its frames repealed prior acts of the British Parliment in Article 395. India celebrates its constitution on 26th January as Republic Day.




The constitution declares India a sovereign, socialist, secular and democratic republic assures its citizen's justice, equality, and liberty, and endeavours to promote Fraternity. The original 1950 constitution is preserved in a nitrogen filled case at the parliment House in New Delhi.

In 1928, all parties conference convened a committee in Lucknow to prepare the constitution of India, which was know as the Nehru Report.

With the exception of scattered French and Portuguess exclaves, India was under the British rule from 1858 to 1947. From 1947 to 1950, the same legislation continued to be implemented as India was a dominion of United Kingdom for these three years, as each princely state was convinced by Sardar Patel and V.P. Menon to sign the articles of integration with Indian and the British Government continued to be responsible for the external security of the country.

**Mittal Kamlakar Warghade**

(S.Y. B.sc.)

# Sigmund Freud's Theories of Personality

## Dynamic Theory of Personality

Freud explained his theory by viewing the conscious, preconscious, and the unconscious as an iceberg. He describes the preconscious and the unconscious as a harmony of psychic and the conscious as resting on perception of the most immediate and certain. The unconscious is under the water, the preconscious is in the middle, and the conscious is on top of the water. How the tip of an iceberg shows little ice, the ego, it's the part under the water that contains the sum of the berg's mass, the id.

## The Oedipus Complex

Oedipus complex is the child unconscious sexual desires for their parent of the opposite sex This is expressed well in the Greek legend of King Oedipus. The king was destined to kill his father and marry his wife. In order to avoid this, he blinds himself but in the end his fait overturns his attempts. A child will develop desires for his mother during the oral stage when he is breast feeding. A young boy's love for his mother builds anger and jealousy toward his father because his is married to the mother. The child's desires to carry out the murder of their father are repressed, but may often later arise in dreams.

## The Psychosexual Stages

Freud believed in the five stages the he explained as the psychosexual stages of development. These are stage a child goes through with different sexual urges happening at each different stage. 1- According to Freud, from birth to age 1, a child would go though the oral stage.

1 A child gets all their feeling from the mouth as it is the primary focus of pleasure. They use their mouth to feed and explore other objects. The feeding of their mother's breast may display the child's desire for his mother.

2 - Between the ages of 1 and 3 the child would go through the anal stage. In this stage the anus became the primary focus of pleasure and the child develops the ability to control ones fecal matter.

3 - During the ages of 3 to 6 the child would go through the phallic stage. This is when the child gets sexually curious and develops a curiosity of masturbation. In this stage you may witness a parent telling their child to stop touching themselves.

4 - From 7 to 11 the child is in the latency stage where he/she develops same-sex friendships. The child tends to focus on school, friendships, and after school activities like sports. During this stage, Freud thought, a child may become subdued of their sexual urges.

5 - In adolescence the child then finishes in the genital stage. The genitals become the primary focus of pleasure while the child seeks to satisfy feeling in a heterosexual relationship. They feel that they have to control their sexual urges in a socially acceptable way.

**Kalpesh Korde**

(S.Y. B.A )

# वैदिक गणित

वैदिक गणित ही प्राचीन गणित सोडवण्याची पद्धत आहे. वैदिक गणितातील सूत्रांचा उपयोग करून आपण गणितातील मोठे मोठे हिशोब अचूक व जलद गतीने करू शकतो. स्वामी भारती कृष्ण तीर्थ जी यांनी वैदिक गणिताचा अभ्यास अथर्ववेदतून केला व तो जगासमोर मांडला. स्वामी कृष्ण तीर्थजीनी वैदिक गणितावर एक पुस्तक लिहिले त्यामध्ये १६ सूत्र आणि १३ उपसूत्र आहे. वैदिक गणिताची संपूर्ण अभ्यास १६ सूत्र आणि १३ उपसूत्रमध्ये समाविष्ट आहे. श्री भारती कृष्ण तीर्थ यांना वैदिक गणिताचे जनक मानले जाते. १९११ ते १९१८ या कालखंडात श्री जगद्गुरू शंकराचार्य स्वामी भारती कृष्णा तीर्थजी हे संन्यासी जीवन जगत होते या काळात त्यांनी वेदांताचा अभ्यास केला आणि वैदिक गणिताचे १६ सूत्र शोधून काढले. वैदिक गणितावर श्री कृष्ण तीर्थजी आणखी अभ्यास करणार होते पण त्याच्या दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू झाला आणि १९६० मध्ये त्यांचा मृत्यू झाला.







**सर्व विद्यार्थ्यांनी वैदिक गणित का शिकावे?**

आपण सर्व स्पर्धेच्या जगात जगतो. आजकाल कोणत्याही शासकीय नोकरीसाठी आपल्याला स्पर्धा परीक्षा देणे अनिवार्य आहे. प्रत्येक स्पर्धा परीक्षेत गणिताचा विषय असतो आणि या विषयाला कमीत कमी एकूण परीक्षेच्या २०% ते २५% गुण असतात. स्पर्धा परीक्षेमध्ये आपण जर गणिताचे प्रश्न सोडवण्यासाठी पारंपारिक पद्धतीचा उपयोग केला तर आपले उत्तराबरोबर येते पण आपला पुष्कळ वेळ खर्च होतो. त्यामुळे उरलेले प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला पूर्ण वेळ मिळत नाही.पण जर आपण वैदिक पद्धतीचा उपयोग करून गणित सोडवले तर आपले उत्तर लवकर व अचूक येते आणि आपला बराच वेळ वाचतो. हा उरलेला वेळ आपण दुसरे प्रश्न सोडवण्यासाठी वापरू शकतो. गणित हा स्पर्धा परीक्षेचा सर्वात जास्त गुण प्राप्त करून देणारा विषय आहे फक्त त्याला वैदिक गणिताचे सूत्रे वापरून सोडवले तर आपल्याला नक्कीच चांगले गुण मिळतील.

**– कु. अश्विनी राजेंद्र पाटील**
(टी. वाय. बी.एस्सी.)

# आयुष्य सोपं-सुरळीत करतो तो गणित

व्यवहारातील गणिताचा विषय काढला की चटकन आठवते ती बाजारात केलेली खरेदी, तेव्हाची आकडेमोड, क्वचित मिळालेली आर्थिक सूट आणि सदा चालणारी घासाघीस! अनेकांची झेप ह्या पलिकडे जातच नाही. शाळेत दहा वर्षे गणित शिकूनही (बहुधा) शाळेचं तोंडही न पाहिलेला भाजीवाला आपल्या आधी हिशोब संपवतो हाच सर्वांचा अनुभव! त्यामुळेच 'इतकं गणित शिकायचं कशाला?' ही खरी समस्या.

वस्तुत: गणिताप्रमाणेच इतरही अनेक विषय आपल्या किती लक्षात राहतात हे पाहणं मनोरंजक ठरेल. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापले आणि गांधीजींनी अहिंसेने स्वातंत्र्य मिळवून दिले ह्या पलिकडे इतिहासातलं काय लक्षात असतं? तापवलेल्या पाण्याची वाफ होते आणि गोठवलेल्या पाण्याचा बर्फ होतो हे आपलं रसायनशास्त्र आणि स्थिर वस्तूला गती येण्यासाठी बल लावावं लागतं इतकीच पदार्थ विज्ञानातली गती! थोडक्यात, इतरही अनेक विषयांशी आपली केवळ तोंड ओळखच राहते, पण गणिताचाच बोलबाला फार! गणिताच्या व्यावहारिकतेबद्दल बोलायचं तर इतकं बोलणं पुरे की गेली काही शतके मानवाने जी तंत्रज्ञानात जबरदस्त प्रगती केली आहे, ज्यायोगे आपले जीवन कमालीचे सुखासीन बनले आहे, त्याच्या पायाशी गणितच आहे. उन्हाळ्यात थंडावा देणारी एसी यंत्रे असोत, जगभरच्या घडामोडी एका सेकंदात सादर करणारा टीव्ही असो, तर्जनीच्या लहानशा हालचालींवर तुमच्या मांडीवर सर्वज्ञान आणून बसवणारा तुमचा लॅपटॉप् असो... सगळ्याच्या मुळाशी गणित हे आहेच!

मूलभूत बेरजा, वजाबाक्या, गुणाकार व भागाकार ह्यांचा उपयोग दैनंदिन आयुष्यात कुठे, कसा आणि किती होतो हे लिहण्याची आवश्यकता नाही. शालेय जीवनात अंकगणिताबरोबर आपण भूमिती शिकतो. भूमितीत समरूपता ही संकल्पना येते. समरूपतेचं मूळ प्रमाण ह्या गणिती कल्पनेत आहे. ह्या समरूपतेचा जागोजागी उपयोग होतो. एखादा कसलेला चित्रकार अप्रतिम निसर्गदृश्य रेखाटताना समरूपतेचाच नाही का वापर करत? त्याच्या त्या दहा-बाय बाराच्या छोट्याश्या चित्रात दिसणारे डोंगर, झाडं, पक्षी त्यांच्या वास्तवातील आकारांपेक्षा कित्येकपट लहान असतात! त्याच चित्रकाराचं एखादं छानसं पोर्ट्रेट आपल्याला हुबेहूब वाटतं. वस्तुत: मूळ चेहऱ्यातील अवयव चित्रातील अवयवांपेक्षा लहान किंवा मोठे असतात आणि तरीही ते हुबेहूब वाटतं, ह्याचं कारण एकच... समरूपता!




संख्याशास्त्र ही गणिताचीच एक शाखा! संभाव्यता हा संख्याशास्त्राचा गाभा म्हणावा लागेल. ह्या संभाव्यतेचा आपण व्यवहारात कितीतरी वापर करतो! पाऊस पुरेसा पडण्याची शक्यता किती? भारत पाकिस्तानला विश्वचषकात हरवण्याची शक्यता किती? बॉस आजारी पडण्याची शक्यता किती? अशा संभाव्यतांनी आपलं विश्व व्यापून टाकलंय. ही संभाव्यताच 'विमा' संकल्पनेची जन्मदात्री आहे. घरातील कर्त्या पुरुषाच्या अचानक मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबावर कोसळणारा आर्थिक घाला वरच्या वर थोपवून धरण्यात गणिताचाच हातभार लागत असतो.

तसं पाहिलं तर गणित दिसत नाही कारण ते आहे.. निर्गुण, निराकार! थोडा पारमार्थिक विचार करायचा झाला तर एकदा का ह्या अमूर्त विषयाशी मैत्री जमली की तुमची आध्यात्मिक प्रगती सहजगत्या होऊ लागते. गणित हे असं व्यवहारापासून परमार्थापर्यंत मानवाची संगत सोबत करतं. आजवर आपण त्याचा आंधळेपणाने अभ्यास केला आणि अजाणता वापर केला. मग जर डोळस विचार आणि जाणता वापर केला तर आज आहोत त्यापेक्षा कितीतरी पटींनी आपण सुखी होऊ, नाही का?

**– कु. मनोज काशिनाथ बुरंगे**

(टी.वाय. बी.एस्सी.)

# निसर्गातील पर्यटनाचा ऱ्हास



प्रत्येक व्यक्तिच्या अंगी काही ना काही सुप्त गुण असतात. त्या सुप्त गुणांचा योग्य रीतीने विकास साधला असता त्या गुणांच्या आधारे ती व्यक्ती स्वतःचे करिअर घडवू शकते. कला शाखेच्या अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाने थोडे व्यावहारिक असणे गरजेचे असते. जागतिक स्तरावर शिक्षणात होणाऱ्या प्रचंड बदलांना सामोरे जात असतांना बऱ्याच ठिकाणी प्रेक्षणिय स्थळे आहेत. त्या स्थळासाठी भेट देऊन तेथील माहिती जनतेपर्यंत पोहचवून आपण आपला व तेथील रहिवाश्यांचा व्यवसाय पर्यटनामुळे वाढवू शकतो व त्या क्षेत्रात असणाऱ्या किंवा रोजगारासाठी भटकणाऱ्या युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. यामुळे तेथील गाव व तो गाव कोणत्या तालुक्यात आहे हे प्रसिद्ध होऊ शकते आणि पर्यटक हे बघण्यासाठी येऊ शकतात आणि हे पर्यटक जेव्हा हे पर्यटन स्थळ बघायला येतील तेव्हा ते तेथील संपूर्ण निसर्ग बघून तेथील माहिती ही ते आपल्या आधुनिक यंत्राद्वारे म्हणजे मोबाईल, इंटरनेट, टेलिग्राम, फेसबुक, ट्विटर यासारख्या माध्यमातून निसर्गाचे फोटो व तेथील माहिती हे जगापुढे मांडतील आणि त्याची संपूर्ण माहिती सर्वत्र पोचवतील. त्यामुळे हेही असली आपल्याला मागच्या पिढीने पोचवलेली नैसर्गिक साधन संपत्ती ती जोपासणे गरजेचे आहे.

यासाठी आजच्या पिढीने मोठ्यात मोठी चौकसपणाची वृत्ती ठेवून तेथील बदल हा क्रमाक्रमाने वाढवला पाहिजे आणि त्यासाठी प्रयत्नसुद्धा केले पाहिजे. कारण आता या काळात मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण व जागतिकीकरण यामुळे निसर्गाचा ऱ्हास होत चाललेला आहे. त्यामुळे सुंदर निसर्ग नष्ट होत चाललेला आहे. तसेच छोटी-मोठी निसर्गाने तयार केलेली आपल्या जवळची नैसर्गिक संपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत हे आपण थांबवले पाहिजे. कारण का तर निसर्गाची देण आहे ती जसेच्या तसी ठेवून आपली संस्कृती जोपासली पाहिजे आणि मागील दृश्य हे डोळ्यासमोर जसेच्या तशी पाहिली पाहिजे.

आज या गतिशील वर्षात आताची पिढी स्पर्धेसाठी जीवाचे रान करत आहे. कारण या धावपळीच्या जीवनाच्या स्पर्धेत जर टिकायचे असेल तर अभ्यास करणे हेच खरे तसेच नैसर्गिक पर्यटन स्थळे जोपासणे व त्यांची दुरुस्ती करणे हेही खरे आहे. पर्यटन म्हणजे प्रामुख्याने करमणूक आणि हेतूसाठी प्रवास करणे आहे. पर्यटन हे अनेक प्रकारचे असू शकते. घरगुती पर्यटनामध्ये त्याच देशातील रहिवाशी त्याच्या स्वतःच्या देशात वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करतात. जेव्हा दुसऱ्या देशातील रहिवासी आपल्या देशात येतात त्याला आंतरराष्ट्रीय किंवा इन बाउंड पर्यटन म्हटले जाते.

पर्यटन हा फक्त एक विरंगुळा आणि मनोरंजनात्मक क्रियाकलापच नाही तर एक व्यवसाय देखील आहे. जे पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करू शकतात. करमणूक करते आणि आपल्या देशाला, गावाला, तालुक्याला उत्पन्न मिळवून देते. पर्यटनामुळे आपल्याला नवीन संस्कृती शिकायची, नवीन लोकांना भेटायची, वेगवेगळ्या ठिकाणी आनंद घेण्याचा साहसी कार्य करण्याची संधी मिळते. पर्यटन हे सार्वजनिक आणि खाजगी उत्पन्नाचे निरंतर स्त्रोत आहे. सांस्कृतिक देवाणघेवाण करण्यासाठी पर्यटन हा एक उत्तम मार्ग आहे. हे नवीन प्रगतीपथावर भेट देतांना पर्यटक एकमेकांना आदर, सहिष्णुता आणि प्रेम दर्शविणे त्यामुळे हे सामाजिक प्रगतीस प्रोत्साहित करते.ज्या परिसरात निसर्गाच्या सहवासात आपण जगतो, जगण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते आपण भरभरून त्याकडून घेत असतो. कधी विकासाच्या तर कधी सुधारणेच्या नावाखाली आपण त्यावर अतिक्रमण करतो आणि त्याला हानी पोचवतो. पर्यटनातही टुरिझम इन्फ्रास्ट्रकच्या विकासासाठी निसर्गावर हल्ले होतात. सुरूंग लावून पहाड उडवले जातात. जंगलाची अपरिमित तोड होते.

पर्यटनाच्या स्थळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा विचार केला असता तेथील नैसर्गिक सौंदर्य, धार्मिक महत्त्व, आस्था, मंदिरे, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक समृद्धी या सर्व घटकामुळे महाराष्ट्राने भारताच्या व जगाच्या नकाशावर आपले स्थान सिद्ध केले आहे. काही पर्यटन स्थळे विकसित झालेली नाहीत. या पर्यटन स्थळाच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. ज्या पद्धतीने पर्यटन स्थळाकडे उद्योगाच्या दृष्टीने विचार करायला हवा इतका केला गेला नाही. एकूणच महाराष्ट्राची पार्श्वभूमी पाहिली असता तेथील पर्यटनाच्या दृष्टीने खूप वाव आहे.

ही नैसर्गिक संपत्ती जर आपणाला टिकवायची असेल तर आपल्याला शिक्षण घेणे गरजेचे आहे. शिक्षणामुळे आपल्या आजूबाजूचा परिसर व नैसर्गिक साधन संपत्ती कशी वापरावी याचे ज्ञान होते आणि आपण जपून ठेवू शकतो म्हणून शिक्षण घेणे व ते जोपासणे आपल्या हिताचे आहे म्हणून सर्वांना शिक्षण घेणे गरजेचे आहे.

***"नैसर्गिक साधन संपत्ती वाचवा! जग वाचवा !!***
***माणूस आपोआपच वाचला जाईल !!!"***

**– विश्वनाथ किसन गावित**

**एम. ए.** (II)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर



भारतातील वर्गलढ्याला आणि जातीअंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही डॉ. आंबेडकर प्रेरणावादी ठरले आहेत. जगाच्या इतिहासात असे योगदान करणाऱ्या अत्युच्च पातळीवरच्या निवडक व्यक्तींमध्ये डॉ. आंबेडकरांचे स्थान आहे असे डॉ. गेल ऑमवेट सांगतात. सामाजिक सुधारणा क्षेत्राच्या संदर्भात विशेषतः वर्ग, जात, धर्म, लिंग ह्यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी डॉ. आंबेडकरांनी काम केले. त्यांनी वेगवेगळ्या जातीतल्या लोकांमधली दरी मिटण्यासाठी तीन महत्त्वाच्या मार्गाचा उल्लेख केला होता. लग्न, खानपान आणि सांस्कृतिक मिलाप. डॉ. आंबेडकरांना बालपणापासून अस्पृश्यतेचा सामना करावा लागला. इ.स. १९३५-३६ या कालावधी दरम्यान लिहिलेल्या वेटिंग फॉर अ व्हिसा या आपल्या आत्मकथेत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेसंबंधी त्यांना आलेल्या कटू अनुभवाच्या आठवणींच्या नोंदी केलेल्या आहेत. हे आत्मचरित्रपर पुस्तक कोलंबिया विद्यापीठात पाठ्यपुस्तक म्हणून वापरले आहे.

राजकीय स्वातंत्र्य आधी की सामाजिक सुधारणा हा टिळक व आगरकर यांच्यातील वाद डॉ. आंबेडकरांच्याही मनात चालत होता. स्वातंत्र्योत्तर भारतात तत्कालीन अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याला काहीच किंमत नसेल, तर त्यातून अधिक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतील. तसे होऊ नये, यासाठी डॉ. आंबेडकरांनी सामाजिक सुधारणा व अस्पृश्यता निर्मूलन ही कार्ये करण्याला अधिक प्राथमिकता दिली. डॉ. आंबेडकर भारतातील ब्रिटिश सत्तेचे सुद्धा विरोधक होते.

सार्वजनिक जीवनात पदार्पण केल्यानंतर पहिली दहा वर्षे डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या चौकटीत राहूनच हिंदू समाजात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पण सवर्ण हिंदूंचा दृष्टिकोन बदलणे अशक्य आहे याची खात्री त्यांना झाली. तसेच हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांची आर्थिक स्थिती व सामाजिक दर्जा सुधारला नाही, याची जाणीव झाल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी असा विचार मांडला की, जसे स्वातंत्र्य हे भारतासाठी आवश्यक आहे तसे धर्म बदलणे हे अस्पृश्यांसाठी आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची संकल्पना होती की- अस्पृश्यांना हिंदू धर्मामध्ये चांगली वागणूक मिळत नाही. तसेच हिंदू धर्म जातिव्यवस्थेचा पुरस्कर्ता असून तो माणसांत भेद करतो. हिंदू धर्मात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता नाही. डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म आणि समाजव्यवस्थेला असा प्रश्न केला. ''जो धर्म अस्पृश्यांना मंदिरात जाऊ देत नाही, पाणी पिऊ देत नाही, ज्ञानार्जन करू देत नाही, आमच्या सारख्यांच्या सावलीचा विटाळ मानतो, हिंदू अस्पृश्यांना तुच्छ मानतो, अशा हिंदू धर्मात अस्पृश्यांनी का राहावे.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे मुंबई प्रांतिक बहिष्कृत परिषदेत मे १९२४ मध्ये अस्पृश्यतेवर उपाय- देशांतर, नामांतर की धर्मांतर या विषयावर विवेचन करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, कोणत्याही धर्माकडे आपण तात्विक तसेच व्यावहारिकदृष्ट्याही पाहिले पाहिजे. तात्विकदृष्ट्या हिंदू धर्म कोणत्याही धर्माच्या आहारी जाणार नाही असे माझे मत आहे. नव्हे कोणत्याही धर्माहून तो श्रेष्ठच गणला जाईल. सर्वाभूती एक आत्मा या मूलतत्वाप्रमाणे समाज संघटन न झाल्याने हिंदू समाजाचे व्यावहारिक स्वरूप किळसवाने झाले आहे. ज्या धर्मात माणसाला माणुसकी नाही तो धर्म काय कामाचा? आपण धर्मत्याग केला तर जे हिंदू लोक आपला तिरस्कार करतात तेच आपल्याला मान देतील. आपण आज आहोत तसे बहिष्कृत असण्याऐवजी एका मोठ्या समाजाचे अंग होऊन काळ न लागता आपली आपण उन्नती करून घेऊ. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जवळील येवला येथे धर्मांतराची घोषणा केली की, मी अस्पृश्य जातीत हिंदू म्हणून जन्माला आलो ते माझ्या हाती नव्हते, पण हिंदू म्हणून मरणार नाही !

त्यावेळेस त्यांनी आपण कोणत्या धर्माचा स्वीकार करणार हे त्यांनी स्पष्ट केले नव्हते. ३० व ३१ मे १९३६ रोजी घेण्यात आलेल्या मुंबई इलाखा महार परिषदेत धर्मांतराच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. परिषदेपुढे बोलतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, अस्पृश्यांनी हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर कोणता धर्म स्वीकारायचा हे प्रत्येकाच्या मर्जीवर अवलंबून आहे. फक्त समानतेचे हक्क मिळतील असाच धर्म त्यांनी स्वीकारावा. ते पुढे म्हणाले, दुर्दैवाने अस्पृश्य हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो. पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. तथापि हा नीच दर्जा झुगारून देऊन ही स्थिती सुधारणे मला शक्य आहे आणि ते मी करणारच. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, हिंदू म्हणून मी मरणार नाही. इ. स. १९३५ या पूर्वी हिंदू पुढाऱ्यांशी झालेल्या भेटीगाठीत हिंदू संस्कृतीचे नुकसान होईल असा धर्म स्वीकारणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली होती. ३० मे १९३६ रोजी जातपात मोडक मंडळाकरिता केलेल्या भाषणात अस्पृश्यांनी बुद्ध वचन लक्षात घेतल्यास त्यांना मुक्तीचा मार्ग सापडेल असे प्रतिपादन केले.

**– मित्तल चंद्रकांत फाळके**
**(एम. ए. II)**

# भारतातील आदिवासींची ओळख, संस्कृती, समाजजीवन



आफ्रिका खंडाच्या खालोखाल भारतात आदिवासींची संख्या जास्त आहे. १९६१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची संख्या २,९८,४६,३०० म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ६.८ टक्के होती. या आदिवासींपैकी निम्मे आदिवासी मध्य प्रदेश (६६ लक्ष), ओरिसा (४२ लक्ष) व बिहार (४२ लक्ष) या तीन राज्यांत आहेत. त्याशिवाय गुजरात (२७ लक्ष), राजस्थान यातही आदिवासी मोठ्या संख्येने आहेत. नागालँड, मेघालय व अरूणाचल प्रदेश ही आदिवासी राज्ये आहेत. भारतीय संविधानानुसार आदिवासींना अनुसूचित जमाती म्हटले जाते. भारतातील सर्व आदिवासी जमातींचा इतर संस्कृतीशी संपर्क आल्याने त्यांच्यात काही महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. या दृष्टीने आदिवासी जमातींचे पाच भागात वर्गीकरण केले गेले आहे. या वर्गीकरणामुळे भारतातील आदिवासी जमातींमधील सांस्कृतिक प्रक्रिया समजण्यास, त्यांच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक स्थितींचे वास्तविक मूल्यांकन करण्यास व त्यांच्या समस्यांवर तोडगा सुचविण्यास मदत होऊ शकते.

भिल्ल आणि गोंड हे महाराष्ट्रात आढळणारे दोन आदिवासी वांशिक गट आहेत. या वांशिक गटांमध्ये असंख्य जमाती आहेत. पश्चिम महाराष्ट्रात कोकणातील खान्देश आणि पालघर जिल्ह्यांतील नंदुरबार आणि शेजारच्या भागात आदिवासी समुदाय जास्त प्रमाणात आढळतात. मध्य भारतीय आदिवासी पट्ट्यातील जमाती पूर्व महाराष्ट्रात प्रामुख्याने चंद्रपूर, विदर्भ, गोंदिया आणि इतर महाराष्ट्र जिल्ह्यांमध्ये राहतात. या जमातींची एक मजबूत सांस्कृतिक ओळख तसेच आदिम उपजीविका आहे. वारली सारख्या जमाती चित्रांच्या रूपात तुलनेने सोपी व सौंदर्यदृष्ट्या आनंद देणारी कला प्रदर्शित करतात तर गोंड लोखंड वितळण्यात त्यांचे शतकानुशतके प्रभुत्व दाखवतात. आर्थिक गैरसोय असतानाही या जमातींनी महाराष्ट्रावर आपली सांस्कृतिक छाप सोडली आहे. त्यांचे वेगळे खाद्यपदार्थ आणि जीवन पद्धती जे स्वयंपाकाच्या साध्या पाककृती आणि वन सामग्रीवर केंद्रीत आहे, त्यांचा ब्रँड बनला आहे.

निसर्गपुजा हा आदिवासी धर्माचा मूलभूत घटक आहे. ते नैसर्गिक शक्ती आणि दैवतीकरण केलेल्या घटकांची पूजा करतात. त्यांच्या धर्म पद्धतीचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणजे वडिलोपार्जित पुजा. त्यांची मौखिक परंपरा आणि पौराणिक कथा मुख्य प्रवाहातील धार्मिक परंपरांना स्थानिक आदिवासी घटकांसह अनोख्या पद्धतीने एकत्र करतात. या सर्व सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक घटकांमुळे अद्वितीय कलात्मक आणि स्थापत्य अभिव्यक्ती निर्माण झाली आहे. आदिवासी सणांनी सांस्कृतिक पर्यटनाचा एक भाग म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. दसरा उत्सव, मुखवटा नृत्य आणि आदिवासी नृत्य हे सर्व त्यांच्या अमूर्त सांस्कृतिक वारसाचा एक भाग आहेत. आदिवासी संस्कृतीच्या या अद्वितीय वैशिष्ट्यांमुळे महाराष्ट्र सांस्कृतिक पर्यटनाच्या कक्षेत आदिवासी पर्यटनासाठी एक विशिष्ट स्थान प्रदान करतो.

भारतातील आदिवासींची कला बहुरंगी आहे. घरावरील नक्षीकाम, स्मशानातील कोरीव खांब, समारंभाप्रसंगीचे पोशाख, आभूषणे, मुखवटे, देवदेवतांच्या आकृत्या इ. प्रकारात आदिवासींची कलादृष्टी दिसून येते. नागा जमातीचे पोशाख, मिझोंच्या टोप्या, टोपल्या, वाद्ये, मासे पकडण्याची जाळी इत्यादीतील रंगसंगती, तसेच कोरीव काम व नक्षीकाम कलात्मक असते. अंगावर गोंदवून घेणे, समारंभाप्रसंगी शरीरास रंग लावणे, केशभूषा करणे, गळ्यात रंगीबेरंगी माळा घालणे हे प्रकार सर्व जमातीत आढळतात. कपड्यांचा वापर फारच अल्प करण्यात येतो. माळा घालणे हे प्रकार सर्व जमातीत आढळतात. माळा चकचकीत दगडांच्या बनवण्यात येतात. नागालँड व मणिपूरमध्ये कपडे जमातीतच विणतात. बोंडो जमातीत झाडाच्या सालीपासून कपडे तयार करतात. गदाबा लोक वाघाच्या कातडीसारखे पट्ट्यापट्ट्यांचे कपडे विणतात. गोंड जमातीत केळीची पाने कमरेभोवती गुंडाळतात.

**– दर्शना तुकाराम गवारी**

**(एम. ए. II)**

# ध्येयाकडे जाताना...

तुम्हाला आयुष्यामधे कधीही न मिळालेली गोष्ट मिळवायची असले तर तुम्ही आजपर्यंत ज्या गोष्टी केल्या नाहीत त्या गोष्टी तुम्हाला कराव्या लागतील. अस बऱ्याच ठिकाणी आपल्याला वाचायला मिळत. मग आपल्याला प्रश्न पडतो की नेमक काय कराव आणि काय करू नये. या प्रश्नाचं एका वाक्यात उत्तर म्हणजे वाचन. वाचन तुम्हाला सक्षम बनवत, विचारांची कक्षा रुंदावत, माणूस म्हणून आपण कसं असावं याविषयी विचार करायला भाग पाडत म्हणून वाचन करणारी माणस घडवणे ही काळाची गरज आहे पण वाचन करणारी माणसे तेव्हा घडतील जेव्हा ती शाळेत जायला लागतील,आणि ती शाळेत तेव्हा जातील जेव्हा त्यांच्या मनात शाळेविषयी आवड आणि प्रेम निर्माण होईल.आणि ही जबाबदारी जेवढी शिक्षकांची आहे तेवढीच पालकांची देखील आहे म्हणून या गोष्टीचा विचार आपण सर्वांनी करायला हवा. पहिली ते चौथी जि.प. प्राथमिक शाळा किंवा फार फार तर ८वी पर्यंत पुढे जवळपास असणारी एखादी आश्रम शाळा १०वी किंवा १२वी पर्यंत. सर्वजण याच वर्तुळातून गेलेलो असतो अगदी मीही त्याला अपवाद नाही.एक गोष्ट या ठिकाणी नमूद करणं मला खुप महत्वाची वाटते आणि ती म्हणजे आपण जेव्हा प्राथमिक शाळेत असतो किंवा आश्रम शाळेत जातो तेव्हा आपण तिथे बऱ्यापैकी हुशार असतो तुमच्यापैकी काही तर पहिल्या पाच जणांच्या यादीमध्ये देखील असालच.कुणी अभ्यासामध्ये पुढे असतं, कुणी खेळामध्ये,कुणी सांस्कृतिक कार्यक्रमात तर कोणी उत्तम प्रकारे गायन- वादनात. मग माझा साधा सोपा आणि सरळ प्रश्न आहे की हेच विद्यार्थी जेव्हा आश्रम शाळेतून बाहेर पडतात आणि पुढील शिक्षणासाठी जेव्हा तालुक्याच्या, शहराच्या ठिकाणी जातात तेव्हा हेच विद्यार्थी आपल्या अंगी असणाऱ्या या कलागुणांना व्यक्त होऊ देतात का? तर या प्रश्नाला मला नाही अस नकारात्मक उत्तर मिळू लागतं तेव्हा मग आपण कोठे तरी चुकतोय का? चुकतोय तर नेमकं कुठे? खरं तर बऱ्याच गोष्टी तुम्ही याआधी अगदी सहजतेने करत होतो पण त्याच गोष्टी आता आपण तितक्या सहजतेने का करत नाहीत?



तुमच्यापैकी बरेच जण माझ्या मताशी सहमत नसालही.तुम्ही म्हणाल की जर असं असतं तर मग १०वी १२विचा निकाल नुकताच लागला त्यामध्ये तर मुलं- मुली वेगवेगळ्या क्षेत्रात अव्वल स्थान प्राप्त करत आहेत.हो अगदी बरोबर आहे आणि ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.पण या गोष्टीच प्रमाण किती आहे २%,५% की १०% बाकीचे कोठे मागे राहिले मग?एका माणसाने १०० पावलं चालून जेवढी प्रगती होते त्याच्या कित्तेक पटीने जास्त १०० माणसांनी एक पाऊल उचललं की खरी प्रगती होत असते आपल्याला अशी प्रगती हवी आहे.

मला जे अनुभव आले,जे पाहिलं त्यामधून मी हे लिहिण्याचा प्रयत्न करतोय.मग हेच विद्यार्थी की जे आश्रम शाळेत असताना अव्वल दर्जाचे होते ते तेथून बाहेर आल्यानंतर स्वतःला का व्यक्त होऊ देत नाहीत?याला बरीच कारण आहेत त्यापैकी काही आपण पाहुयात...

### ✻ भीती आणि न्युनगंड: –

भीती तर प्रत्येकालाच असते वेगवेगळ्या गोष्टींची. परंतु या भीती पेक्षा मला न्युनगंड असल्याची भीती खुप वाटते. म्हणजे आपल्यामध्ये एखादी गोष्ट करण्याची शक्ती असते, सामर्थ्य असतं परंतु तरी आपल्याला वाटतं की मी हे करू शकत नाही. हीच गोष्ट तुम्हाला व्यक्त होऊ देत नाही.मी चुकलो तर?बाकीचे काय म्हणतील?हसतील का मला? असे असंख्या प्रश्न आणि या गोंधळात तुमच्यासमोर आलेली संधी निघून पण गेलेली असते.

### ✻ वातावरण :–

तुम्ही आधी ज्या ठिकाणी होता मग ती आश्रम शाळा असेल त्या ठिकाणच्या वातावरणाशी तुम्ही मिसळून गेला होता.म्हणजे थोडक्यात त्या ठिकाणच्या प्रत्येक गोष्टीची तुम्हाला सवय झालेली होती.कोण कोठे,कसे,केव्हा येईल हे सगळंच तुम्हाला माहिती झालं होतं.म्हणून तुम्ही मोकळ्या मनाने व्यक्त होत होता.आणि आता मात्र या ठिकाणी सगळं काही नवीन आहे त्यामुळे वातावरणात तुम्ही मिसळून न गेल्यामुळे तुम्हाला हवं तसं व्यक्त होता येत नाही.

### ✻ भाषेची अडचण :–

बऱ्याच वेळा अस होत की १०वी पर्यंत मराठी माध्यम आणि नंतर ११वीला विज्ञान किंवा मग इतर कोणत्या तरी शाखेत आपण अर्ज करतो.विज्ञान शाखेत सर्व इंग्रजीमध्ये असतं त्यात आपला अगोदरच इंग्रजीचा प्रॉब्लेम आणि इथे सकाळ पासून संध्याकाळी होस्टेल किंवा घरी येईपर्यंत फक्त इंग्रजीचं. मग आपोआपच मनामध्ये भीती आणि न्युनगंड वाढू लागतो. त्याच्याही पुढे जर आपण शहराच्या ठिकाणी गेलो तर आपल्या बोलीभाषेमुळे देखील आपण व्यक्त होण्यास घाबरतो.आपलं गावठी बोलणं ऐकून कोणी आपल्याला हसेल का? वगैरे वगैरे गोष्टी मनात यायला लागतात.

### ✻ मित्र :–

तुमच्या सोबत कोण आहे किंवा तुम्ही कुणाच्या सोबत

आहेत या गोष्टी सुद्धा खुप महत्वाच्या.कारण तुम्ही त्यांच्या सोबत राहून नकळत हळू हळू त्यांच्या गोष्टी स्वीकारू लागता. आणि या गोष्टी तुम्हाला होस्टेल मध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांनमध्ये सहज बघायला मिळतील.म्हणजे समजा तुमचे मित्रच जर नकारात्मक दृष्टीकोनाचे असतील तर तुम्ही कितीही सकारात्मक विचार केला तरी तो तुम्ही वास्तवात आणू शकणार नाही किंबहुना तुम्हाला आणखी जास्त वेळ लागेल.तुमच्या मित्रांना जर वाचनाची आवड असेल तर तुम्हीही नकळत वाचनालयाकडे वळू लागाल.

**☼ वेळेचं नियोजन :–**

१०वी पर्यंत तस पाहिलं तर शाळेव्यतिरिक्त आपल्याकडे खूप वेळ असतो.म्हणून मग आपण अभ्यासाचं फार तंतोतंत नियोजन करत नाही काही अपवाद सोडले तर.त्यामुळे पुढेही आपल्याला तीच सवय लागून जाते की जेव्हा परीक्षा येईल तेव्हाच अभ्यास करायचा आणि आपण येथेच चुकतो.खर तर तिकडे सर्व मराठीत होत एक वेळ दोन वेळ वाचलं की लक्षात राहून जायचं. परंतु इथे सगळं इंग्रजी आहे हे मात्र आपण तेव्हा विसरून जातो.इकडे प्रात्यक्षिक असतात संध्याकाळी उशिरा होस्टेलवर येतो आणि मग थोडा आराम वगैरे यात वेळ निघून जातो अभ्यास बाजूला तसाच राहून जातो,हळूहळू परीक्षा येतात आणि आपले मार्क्स देखील हळूहळू कमी यायला लागतात.

**☼ स्वतःची तुलना :–**

तालुक्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी जेव्हा आपण शिक्षण घेण्यासाठी जातो तेव्हा तिथे फक्त मराठी माध्यमाची मुलं मुली असतात असं नाही.आणि आपण हे विसरून जातो मग नकळत आपली तुलना आपण त्यांच्या बोलण्याशी,त्यांच्या येणाऱ्या उत्तरांशी आणि परीक्षेतील गुणांशी करू लागतो.मग त्यामधूनच मला काहीच येत नाही ! मी हे नाही करू शकत वगैरे वगैरे शंका मनात येऊ लागतात.प्रत्येकाची घेण्याची क्षमता वेगवेगळी असते आपण आपली क्षमता ओळखायला हवी.

**☼ प्रेम :–**

बऱ्याच गोष्टी आहेत पण हे लेखन खुप मोठं होईल आणि मोठं म्हणून वाचनाचा तुम्ही कंटाळा कराल म्हणून हा शेवटचा मुद्दा घेतो. प्रेम या विषयावर काही लिहिण्या इतका मी मोठा नाही परंतु काही बोललो नाही तर हा तुमच्यावर आणि माझ्यावरही अन्याय होईल.माझं असं प्रामाणिक मतं आहे की जगातील प्रत्येक गोष्टीमध्ये प्रेम आहे.फक्त ते आपण शोधायला हवं.परंतु या ठिकाणी इतर प्रेम जसं की आई वडिलांचं प्रेम ,मित्रप्रेम ,निसर्ग प्रेम ,प्राण्यांवरील प्रेम या गोष्टीवर न बोलता एक प्रियकर आणि प्रियसी या दोघांमधील प्रेमाविषयी बोलणार आहोत.कारण हे एक ठराविक वय असतं की ज्या वयामध्ये प्रत्येकाला वाटतं की आपल्याला आता कोणाची तरी सोबत हवी आहे.मग ती सुखदुःख वाटण्यासाठी असेल,आनंद व्यक्त करण्यासाठी असेल किंवा आणखी काही प्रत्येकाच्या विचारानुसार वेगळी कारण मिळत जातील.

परंतु इथं आपलं एक चुकत आणि ते म्हणजे बऱ्याच वेळा अस होत की माझ्या मित्राला एक प्रियसी आहे किंवा मैत्रिणीला एक प्रियकर आहे म्हणून मला सुद्धा हवाय ही समजूत पूर्णपणे चुकीची आहे.कारण येथूनच मग पुढील चुकीचे रस्ते देखील आपोआपच मिळत जातात.प्रेम तर निर्मळ असतं, पवित्र असतं, ते मोजून मापून करता येत नाही,निस्वार्थी प्रेम हे खरं प्रेम असतं. परंतु त्या वयात आपल्याला हे फारस समजत नाही मला ती किंवा तो हवा आहे.का हवा आहे? करण्यासाठी हवा आहे? हे काहीच माहिती नसतं. आणि ही गोष्ट देखील तुमचे मित्र कसे आहेत यावर खूप अवलंबून आहे. या वयात प्रेमाच्या चुकीच्या समजुतीमुळे तुम्ही जो वेळ अभ्यासाला, खेळाला, घरच्यांना,मित्रांना द्यायला हवा होता तो तुम्ही देऊ शकत नाहीत आणि तुम्ही एका आभासी दुनियेत फिरत असता की ज्याचा वास्तविकतेशी काहीही संबंध नसतो.तुम्ही प्रेम करू नका या मताचा मी मुळीच नाही,तुम्ही प्रेम करा पण प्रेम या पवित्र शब्दाचं पावित्र्य तुमच्या किंवा माझ्या मुळे कमी होता कामा नये.तुम्ही जर प्रेमाचा खरा अर्थ समजून प्रेम करत असाल तर प्रेमात चुकीच्या मार्गाला कधीच जाणार नाहीत. त्यामुळे यावर तुम्ही स्वतः देखील चांगला विचार करावा...

मी जे काही लिहिलंय तेच फक्त खरं अस अजिबात नाही तुम्ही देखील या कारणांचा विचार करा इतरांशी बोला तुमच्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला तुमच्याकडूनच मिळत जातील.आणि हो वेळ भेटेल तेव्हा एक काम करत जा स्वतःशी बोलत जा...खुप साऱ्या गोष्टी आहेत तुमच्याकडे पण त्या तुम्हालाच माहिती नाहीत. नेहमी एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करूयात. आणि आजपासूनच आपण चांगल वाचायला सुरुवात करूयात तुमच्याकडे जे उपलब्ध पुस्तक असेलते तुम्ही वाचावं. तुमच्या अंगी असणाऱ्या कला गुणांना तुम्ही स्वतः प्रोत्साहन द्या. महाविद्यालयाचा पुढील अंक तुमच्या कलेची वाट पाहतोय..

शेवटी श्रीकृष्ण राऊतांचे शब्द उसने घेऊन इतकच म्हणतो...

*''नाही दिवा जरीही पडक्या घरात माझ्या*

*हा सूर्य पाळला रे उरात माझ्या*

*बघतोच हा पाऊस कसा येत नाही*

*ही वीज पेरली रे या वावरात माझ्या*

*ही वीज पेरली रे या वावरात माझ्या.''*

*मनःपूर्वक धन्यवाद.*

**प्रा.किरण पारधी**

**(प्राणिशास्त्र विभाग)**

# वर्तनवाद

जॉन वॅटसन हा वर्तनवादाचा जनक मानला जातो. त्याने अमेरिकेत विसाव्या शतकात वर्तनवादाची स्थापना केली. शरीर शास्त्रज्ञ पॅवलो यांच्या अभिसंधनाच्या शोधाने वॅट्सन प्रभावित झाला. त्याने मनाची संकल्पना पूर्णतः नाकारली व केवळ निरीक्षण करण्यायोग्य बाह्य वर्तनाचा अभ्यास मानसशास्त्राने करावा असे ठाम मत मांडले आहे. मानवी वर्तनाचे अभ्यास करणारे शास्त्र म्हणजेच मानसशास्त्र होय असे वॅटसन याचे मत होते.



बोधनिक अनुभवांचा अभ्यास मानसशास्त्राच्या क्षेत्रात मोडतो. या मतावर वॅटसनने टीका केली आहे. त्याच्यामते इतर शास्त्राप्रमाणेच मानसशास्त्रज्ञांनी प्रयोग व निरीक्षणाच्या आधारे मिळवलेला प्रदत्त सर्वांसाठी परीक्षणास उपलब्ध करून दिला पाहिजे. तसेच बोधनिक अनुभव खाजगी आहेत, तर वर्तन हे सार्वजनिक स्वरूपाचे आहे. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने मनात काय विचार केला आहे. हे जोपर्यंत ती व्यक्ती काही कृती करत नाही किंवा काही बोलत नाही तो पर्यंत आपणास समजत नाही. उदा. कोहलर यांनी त्यांच्या मर्मदृष्टी अध्ययनाच्या सिद्धांतात जो प्रयोग केला, त्या प्रयोगात सुलतान नावाच्या माकडाला एका पिंजऱ्यात ठेवले आणि त्या पिंजऱ्याच्या छताला केळींचा घड लटकविला व काही लाकडी खोके पिंजऱ्यात ठेवली. बऱ्याच वेळा प्रयत्न करूनही त्याला त्या केळी मिळविता आल्या नाही. परंतु थोड्या वेळाने माकडाने आपल्या जवळ पडलेली खोकी एकमेकांवर ठेवली व त्यावर चढून त्याने केळी मिळविल्या. या प्रयोगाचा विचार केला तर, त्या माकडने मनात काय विचार केला आहे. हे जोपर्यंत त्याने कृती केली नाही तोपर्यंत कळत नाही. वॅट्सनच्या मते जे दृश्य आहे जे मापणीय आहे. त्याच गोष्टीचा समावेश मानसशास्त्रात करावा.

सर्व वर्तनवादी मानसशास्त्रज्ञांनी अशी भूमिका घेतली की वर्तन हे अभिसंधनातून घडून येते व परिस्थितीतून विशिष्ट सवयींनी वर्तन प्रकारांना प्रबलीकरण मिळाल्यामुळे वर्तनाला आकार दिला जातो. उदाहरणार्थ लहान मुलांची प्रत्येक मागणी पुरवली गेली म्हणजेच त्यास प्रबलीकरण मिळत गेले की, पुढे ते हट्टी स्वभावाचे होते व हवी ती वस्तू मिळाली नाही की आक्रस्ताळेपणा करू लागते. तसेच लहान मुलांच्या आक्रमक वर्तनाला प्रत्येक वेळी शिक्षा केली की त्याचे आक्रमक वर्तन हळूहळू कमी होत जाते. अभिसंधित प्रतिक्रिया हा वर्तनाचा लहानसा भाग आहे. परंतु त्यातूनच पुढे गुंतागुंतीचे वर्तन प्रकार विकसित होतात वर्तनवादानुसार वर्तनाचे स्वरूप उद्दीपक आणि प्रतिक्रिया या सूत्रात आढळून येते व त्या दृष्टीने मानवी वर्तनाचा अभ्यास केला जाऊ लागला. यातूनच उद्दीपक प्रतिक्रिया मानसशास्त्राचा उगम झाला. वॅट्सन यांनी असे सांगितले की, मानव आणि मानवेतर प्राण्यांच्या वर्तनामध्ये कोणताही मूलभूत असा फरक नाही. दोघांच्याही वर्तनाचे आकृतीबंध सारखेच असतात तसेच मानवेतर प्राण्यांच्या वर्तनाच्या अभ्यासातून माणसास पुष्कळ काही शिकता येते. त्यांच्या वर्तनाचा अभ्यास मानवी वर्तनाच्या अभ्यासास मदतीचा ठरतो. मानव व मानवेतर प्राण्यांच्या अभ्यासासाठी प्रयोग, नैसर्गिक निरीक्षण अत्यावश्यक असल्याचे मत त्यांनी ठामपणे मांडले. म्हणजेच त्यांच्या अनुभवाधीष्टीत अभ्यासास त्यांनी महत्त्व दिले, तसेच सहज प्रवृत्ती किंवा जन्मजात वर्तन प्रकार या संकल्पना फेटाळून लावल्या. याउलट त्यांनी अध्ययनाने आत्मसात करण्यात आलेल्या वर्तन प्रकारास अधिक महत्त्व दिले. अनुभवातून अध्ययनातून मानवी वर्तन घडून येते त्यास आकार दिला जातो या कल्पनेवर त्यांनी भर दिला. उद्दीपकाला प्राप्त प्रतिक्रिया म्हणजे वर्तन वर्तनात बदल हे केवळ बाह्य परिस्थितीतून प्रतिक्रियेस प्राप्त परिणांमामुळेच घडून येतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. प्रतिक्रियेच्या परिणामी प्रबलन (बक्षीस,उत्तेजन) मिळाले असता वर्तन दृढ होते, तर शिक्षा मिळाली असता ते लुप्त होते. तेव्हा वर्तनवादांचा सर्व भर अभिसंधित प्रतिक्रियांवरच असतो.

**सुभाष भोये**
**(एस.वाय. बी.ए)**

# Polio

Polimyelitic, commonly called pollio, is an acute viral infection caused by an RNA virus, affecting primarily the alimentary canal, vaccination eliminated the disease from developed countries since 1954. Eradication strategies reduced the polio endemic countries from 125 in 1988 for to four countries in 2008 and India being one them. As there is no specific treatment, vaccination is the sole method for eradication.

zero dose of Oral polio vaccine (opv) is recommended to be given and is generally practiced for the babies delivered in health institutions. The WHO program on Immunization and the National Immunization program in India envisages a mandatory 32 primary couse of 3 dosese of Opv (even after the zero dose) at one month's interval. It starts with the first dose when the child is 6 weeks old. All the vaccination is to be completed before the baby is 6 months of age, because most cases of polio in Indio occur from 6 months to 3 yrs of age, one booster dose of Opy is recommended 12 to 18 months later of the third dose i.e. 24 months of age.

Pulse polio Immunization program (PPIP) was launched in the country in 1995. children under's years of age are given additional polio drops in december and january every year on fixed days. regardless immunization services.

**Strategies for polio eradication in India are as Follows:**

a. observe pulse polio Immunization days every year till polio is eradicated.



b. Sustain high levels of routine immunization coverage.

c. monitor opv coverage at all levels.

d. Detecting all cases of Acute flaccid paralysis (AFP) due to polio and non-polio etiology by improving Surveillance.

e. Rapid collection of stool samples from cases for virus isolation.

F. Follow-up of all cases of AFP OF 60 days to check for residual paralysis.

g. control measures to stop transmission all cases confirmed or suspected to be poliomylitis.

**Outcome :-** There is significant decline in the incidence of poliomyelitis in India.

**Akshay Sawanji Mali**
**(F.Y. BSc.)**

# माणूस आणि समाज




माणसांची मने हल्ली भुकेलेली असतात. त्यांना प्रेम हवे असते. सोबत हवी असते. विचारांचे खाद्य हवे असते. हे सर्व समाज पुरवित असतो. म्हणून माणूस हा समाजप्रिय प्राणी झाला. तो एकटा कधीच राहू शकणार नाही. आपण आपले कुटुंबीय आपले नातेवाईक, शेजारी, मित्र, व्यावहारिक संबंधांतून आपल्या संपर्कात येणारे इतरजण इत्यादींचे संघटन म्हणजे समाज.

आपल्या जन्मापूर्वी हा समाज होता. आपल्या मरणानंतर हा समाज राहणार आहे. आपण व्यक्तीश: या समाजाचे एक घटक आहोत. ही जाण माणसाने ठेवली पाहिजे. मानवी समाजाला एक संस्कृती असते. या संस्कृतीचे काही नीती-नियम असतात. माणूस या नीती-नियमांचा भंग करतो तेव्हा आपण त्याला समाजद्रोही म्हणतो.

मानवी समाजात साजरे होणारे विविध समारंभ उत्सव त्या समाजाच्या चालीरिती या सर्वांची एक विशिष्ट चौकट तयार झालेली असते. माणूस त्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही. माणसाचे सामाजिक जीवन सुरळीत चालावे यासाठी मानवाने राज्यसंस्था, शैक्षणिक संस्था, धर्मसंस्था, विज्ञानसंस्था, अर्थसंस्था इत्यादींची निर्मिती केली. समाजजीवन अधिक सुखी, समृद्ध समाधानी व्हावे म्हणून या संस्थांमधल्या प्रतिभावान व्यक्ती कार्यरत असतात.

समाजामध्ये परोपकारी, निष्काम कार्य करणारी मंडळी असतात. तेव्हा तो समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असतो. परंतु समाजात स्वार्थी, दृष्ट प्रवृत्तीच्या माणसांचे प्राबल्य वाढते तेव्हा समाजात अशांती, असमाधान निर्माण होते. आजकाल ज्याच्याकडे सत्ता-संपत्ती आहे त्यालाच समाजात मान सन्मान मिळतो. हे निरोगी समाजाचे लक्षण नाही.

पूर्वकाळात 'समाज' म्हणजे सर्व जातींच्या आणि धर्माच्या जनतेने आपापले समाज निर्माण केले आहेत. यात गैरकाही नाही. परंतु त्यात स्पर्धा, हेवेदावे, उच्च-नीचता या भावनांमुळे 'मानव व समाज' या संकल्पनेला धक्का पोहचत आहे. जो तो आपल्या समाजापुरते पाहू लागला आहे. त्यामुळे मानवी समाज या संज्ञेला तडे जाऊ लागले आहेत. समाजात गायक विविध वाद्य वाजवणारे नट-नट्या, शास्त्रज्ञ, साहित्यिक, कवी, शेतकरी, कुंभार, सुवर्णकार इत्यादी विविध कर्म करणारे सर्वजण असावे लागतात. या विविधतेत आनंद आहे. प्रत्येकाने दुसऱ्याचा आदर केला पाहिजे. असे म्हटले जाते की, एखाद्या समाजाची प्रकृती आणि प्रवृत्ती समजून घ्यायची असेल तर तो समाज साहित्यिक, शेतकरी आणि सैनिक यांचा किती आदर करतो त्यावर अवलंबून असते.

समाजात विविधता असते त्याप्रमाणे निसर्गातसुद्धा विविधता आहे. सर्व फुले आणि सर्व फळे एकाच रंगाची आणि एकाच चवीची असली, तर त्यात कुठला आनंद राहिला असता? निसर्गात विविधता आहे तशीच समाजातसुद्धा ती असली पाहिजे. प्रत्येकाने आपले समाजाचे कर्म ठरवून घ्यावे. समाजसेवा हिच खरी ईश्वर सेवा आहे. भगवंतांनी गीतेत प्रत्येक कर्म पवित्र आहे, असे सांगितले आहे. समाजात कुणी श्रेष्ठ नाही, कुणी कनिष्ठ नाही आपल्या संस्कृतीत वर्णावर्णात उच्च-नीचता आली तेव्हा आपला समाज आतून पोखरला जाऊ लागला.

लोकसंख्येत एवढी वाढ झाली आहे की समाजात आपुलकी, प्रेमभावना नष्ट होत चालली आहे. प्रत्येकजण स्वत:चे प्रश्न सोडविण्यात एवढा गर्क झाला आहे की सामाजिक प्रश्नांकडे लक्ष देण्यास त्याच्याकडे वेळ नाही. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आपली सुख-दु:खे सांगण्यासाठी हक्काची माणसे दुर्मिळ होत आहेत. शेतकरी आत्महत्या करु लागले आहेत. परीक्षेत कमी गुण मिळाल्यावर विद्यार्थ्यांत नैराश्य निर्माण होत आहे. व्यापारात खोट आल्यामुळे सर्व कुटुंबाला उपासमारीने स्वत: आत्महत्या करणारे लोक आपण पाहत आहोत.

आज समाजात नि:स्वार्थ सज्जन, परोपकार करणारे किती लोक उरले आहेत? लोकसंख्येचा विचार करता त्यांची संख्या कमी किंवा मोजता येतील एवढे लोक उरले आहे.

असा हा माणूस आणि समाज आजच्या युगात वावरत आहे आणि असाच राहिला तर मानव हा समाजापासून दूर होत जाईल. त्यामुळे 'माणूस आणि समाज' ही एक चिंतेची बाब आहे.

**कांतीलाल लहारे**
(एफ. वाय. बी. ए.)

# ई - बँकिंग

ई- बँकिंग म्हणजे इलेक्ट्रॉनिक बँकिंग होय. इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून केला जाणारा बँक व्यवसाय म्हणजे ई-बँकिंग होय. जेव्हा बँक सेवा पुरवण्याच्या व्यवस्थेत माहिती तंत्रज्ञानाची अत्याधुनिक साधने वापरली जातात तेव्हा त्यास ई बँकिंग असे म्हणतात. खात्याची चौकशी करणे, पैसे भरणे, पैसे काढणे, रकमेचे हस्तांतरण करणे यासारखे व्यवहार ई-बँकिंगमुळे तत्परतेने पार पडतात. ई-बँकिंगमुळे प्रत्येक वेळी ग्राहकांना बँकेत जाण्याची गरज पडत नाही. संगणकाद्वारे किंवा मोबाईलद्वारे ग्राहक घरातून किंवा कचेरीतून व्यवहार करू शकतात.



### ई- बँकिंगचे व्यवहार

१. पैसे खात्यावर जमा करणे व पैसे काढणे.
२. खाते उताऱ्याची प्रत मिळवणे.
३ खात्याची अद्ययावत माहिती मिळवणे.
४. धनादेश पुस्तिका, धनाकर्ष इत्यादी मिळविणे.
५. ठेवी व कर्जावरील व्याजदर व इतर शुल्क यांची अद्ययावत माहिती मिळवणे.
६. ग्राहकांच्या वतीने देणी देणे.
७. ग्राहकांच्या विनंतीनुसार रकमेचे हस्तांतरण करणे.
८. ग्राहकांच्या वतीने वीज बिल, टेलिफोन बिल इत्यादीचा भरणा करणे.

### ई-बँकिंगचे फायदे

ई-बँकिंग सेवा वापरून ग्राहक वेळेची आणि पैशाची लक्षणीय बचत करू शकतात. या सेवा ग्राहक संबंध व्यवस्थापन कार्यक्षमता देखील सुधारतात. ग्राहक असेल त्या ठिकाणी सुविधा मिळणे हा इंटरनेट बँकिंगचा सर्वात आवश्यक फायदा आहे. घर किंवा कामाची जागा न सोडता बटणाच्या स्पर्शाने व्यवहार आणि पैसे देणे ही एक सोय आहे जी कोणीही सोडू इच्छित नाही. बँकेला भेट देण्याच्या तुलनेत, इंटरनेटवर खात्यांचा जलद मागोवा ठेवणे अधिक सोयीस्कर आहे. ई-बँकिंग सेवांद्वारे चेकबुक ऑनलाइन मिळवणे, खाती अद्ययावत करणे आणि नंतर विविध आर्थिक उत्पादनांवरील व्याजदरांबद्दल चौकशी करणे यासारख्या सेवा बऱ्याच प्रमाणात सुलभ केल्या जातात.

ग्राहकांना ई-बँकिंग वापरण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, बहुतेक बँका कमी किंवा नो-डिपॉझिट खाती, तसेच मुदत ठेवी लवकर काढण्यासाठी कमी दंड प्रदान करतात. या प्रकारच्या बँकिंगमध्ये कमी शारीरिक श्रम आणि जास्त बक्षिसे लागतात. ऑफिस स्पेस वाढवण्याची आणि ग्राहकांशी व्यवहार करण्यासाठी अधिक लोकांना नियुक्त करण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे, परिणामी बँकांच्या खर्चात मोठी बचत होते.

अलीकडच्या वर्षांत, ई-बँकिंगने मोबाईल इंटरनेट बँकिंगच्या रूपात एक पाऊल पुढे टाकले आहे, जे ग्राहकांना अमर्यादित गतिशीलता प्रदान करते आणि त्यांना प्रवासात आर्थिक व्यवहार करण्यास अनुमती देते. ई-बँकिंग व्यवहार दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस, बँकेला प्रत्यक्ष भेट न देता पूर्ण करता येतात. ऑनलाईन बँकिंग सेवा वापरण्याचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे ते वापरकर्त्यांना अनेक सवलतींचा लाभ घेण्यास अनुमती देते. लोक जेव्हा त्यांचे डेबिट किंवा क्रेडिट कार्ड वापरतात तेव्हा किरकोळ दुकानांमध्ये विविध सवलतींचा लाभ घेऊ शकतात.

माहिती तंत्रज्ञानाने बँक आणि ग्राहक दोघांनाही बँकेच्या वेबसाइटवर लॉग इन करून माहिती मिळवणे अत्यंत सोपे केले आहे. आर्थिक नियोजन क्षमता, कार्यात्मक अंदाजपत्रक आणि अंदाज साधने, कर्ज कॅल्क्युलेटर, गुंतवणूक संशोधन साधने आणि इक्विटी ट्रेडिंग प्लॅटफॉर्म ही सर्व ई-सेवांची उदाहरणे आहेत. त्याशिवाय, बहुतेक बँका ऑनलाईन कर फॉर्म आणि कर तयारी सेवा देतात. व्हर्च्यूअल बँकिंग प्रणाली वर्षातील ३६५ दिवस दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी पैसे हस्तांतरित करण्याची परवानगी देते. ग्राहक त्यांच्या व्यवहारांचा मागोवा ठेवण्यासाठी आणि त्यांचे बजेट व्यवस्थापित करण्यासाठी त्यांचे अपडेट केलेले पासबुक कधीही तपासू शकतात. ग्राहक विविध खात्यांसाठी त्यांचा व्यवहार इतिहास मिळवू शकतात आणि कोणताही ऑनलाईन व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी खात्यावरील विश्लेषण करू शकतात. परिणामी, पैशाचे चांगले व्यवस्थापन शक्य आहे.

**शरद देवराम आचारी**
(एस. वाय. बी. कॉम.)

# Concept of Communication

- **What is communication?**

  Communication is a social process that is vital for human survival. Communication makes it possible to exchange opinions, thoughts and meaning through spoken words, written text nonverbal sounds physical gesture facial expressions and even dance or combination of these. In Today's world there is so much to know so quickly that the role of communicator has become very important. The world experiencing communication revolution and communication explosion. Communication is essential to all human association. Good communication does not mean only giving orders but creating understanding. It aims at imparting knowledge as well as helping people gain a clear view of the meaning to knowledge.



- **Meaning**

  The word communication is derived from the Latin Word "Communicare / Communise "which means to make common. Communication involves the transfer of information, ideas, emotion, feeling etc. between people. Communication must ensure that this transfer takes place effectively, bringing about an understanding response from the receiver of the message.

- **Definition**

  "Communication is the transfer of information from a sender to a receiver, with the information being understood by the receiver."

  **- Koontz and Weihrich**

  "*Communication is an exchange of facts, ideas, opinions or emotions by two or more persons.*"

  **- Newman and summer**

- **Process of Communication**

  Communication begins when the sender feels a need to share an ideas or thoughts in his mind. The purpose of the sender could be to inform or to persuade or to motivate the receiver. Similarly, the message could make use of verbal or non-verbal symbols, words or signs. Thus, the sender and the message are the first two components in the process of communication.

- **Sender :** Otherwise known as a source, it is the person who has something to pass on, to another individual.
- **Encoding:** The sender of the message selects appropriate words or non-verbal techniques to convert the idea into the message, which is called as encoding.
- **Message :** Message implies something that the sender wants to communicate, to the receiver. Without a message, no communication is possible.
- **Medium:** Medium alludes to the channel or mode, through which message is communicated to the receiver, i.e. it can be sent by way of electronic word processing system, graphic, symbol, etc.
- **Receiver:** The one to whom the message is directed, is called receiver. He/she notices and conveys some meaning to the message.
- **Decoding:** The act of interpreting message by the receiver is termed as decoding. The receiver's outlook, experience, and attitude play a vital role in decoding message.
- **Feedback:** The process of communication can never be completed, if the response of the receiver is missing. It enables the communicator of a message to know whether the message

has been received and interpreted in the same manner as directed.

- **Types of Communication**

The four main categories of communication are as follows

**I) Verbal** - It is a method that uses speech in the form of speaking to convey a message or information. It is the most popular and effective mode of communication, usually practiced during video conferences, phone calls, presentations, one-on-one conversations, and meetings. It supports both nonverbal and written communication.

**II) Nonverbal** - It is basically a practice of gestures, facial expressions, and body language to send information. It can be implemented intentionally and unintentionally when communicating. For instance, a person can smile unintentionally when they hear an interesting piece of information or a pleasant idea.

**III) Written** - It is all about typing, printing symbols, numbers, letters, and writing to send a piece of information. Sometimes used to record information for evidence or reference purpose. In general, the written style of communication is used in books, blogs, pamphlets, memos, and letters to share and spread information. In the workplace,e-mail is a common example of written communication.

**IV) Visual** - It uses art, photographs, sketches, graphs, charts, and drawings, to pass on the information. It is used especially during presentations to present to give a visual effect and support written or verbal communication.

- **Mode of Communication**

**I) Formal Communication :** Formal Communication refers to communication that takes place through legal channels in an organization. That kind of communication takes place between managers or employees of the same class or between high and low and vice versa. It may be oral or written but a complete record of that communication is kept in the organization.

**II) Informal Communication :** Informal communication is defined as any communication that occurs outside of the official channels of communication. Informal communication is often referred to as the "vine' as it spreads throughout the organization and on all sides regardless of the level of authority.

- **Importance of Communication**

Without communication, working in an organization would not be easy. Here, we have listed several points that reflect the importance of communication.

**I) Increases efficiency** - Without a doubt, efficient communication increases managerial efficiency. Without communication, nothing can happen in an organization. Hence, it can be said a manager's efficiency can be measured with his ability to communicate.

**II) Facilitates coordination** - Communication promotes exchanging ideas, bringing harmony and purpose that facilitates coordination.

**III) Smooth organization working** - Experts believe communication acts as a lubricant to foster smooth organization. Hence, it can be said that a lot depends on communication quality when it comes to organization and life in general.

**IV) Easy decision-making** - Communication plays a significant role in making decisions and planning for the future. It allows management to store information easily; else, it would be nearly impossible to make any reliable decision.

- **Conclusion**

With this, we come to the end about the concept of communication. In this article, we covered multiple areas of the concept of business communication, including the definition of communication, which can be defined as sending and receiving specific messages either through verbal or non-verbal communication. There are mainly four types of communication. These include verbal, non-verbal, written, and lastly, visual. In this concept of communication study material, we discussed all four types and the importance of communication.

**Shivaji Valvi**

(F. Y. B. A.)

# पद्य विभाग

‘ओळखलंत का सर मला’ पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी.
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून;
‘गंगामाई’ पाहुणी आली, गेली घरट्यात राहुन
माहेरवाशिणीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी  बायको मात्र वाचली
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले,
प्रसाद म्हणून पापण्यांवरती पाणी थोडे ठेवले
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला
कारभारणीला घेउन संगे सर, आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखल गाळ काढतो आहे
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून, तुम्ही फक्त लढ म्हणा !

**कवी - वि. वा. शिरवाडकर**
**(कुसुमाग्रज )**



## आज क्षणभर

का कुणास ठाऊक?
आज क्षणभर थांबावस वाटतं.

हरवलं मन
पुन्हा शोधावसं वाटतं

अशांत हे मन
शांत करावस ं वाटतं

होऊन अपेक्षाशून्य
चिंतामुक्त व्हावस वाटतं.

थांबवून धडपड सारी,
आज स्तब्ध व्हावस वाटतं,

भरल्यापोटी
शांत निजावसं वाटतं,

आज जन्म आणि मृत्यू
अंतर विसरावसं वाटतं,

का कुणास ठाऊक ?
थोडसं प्रेम,
आज स्वतःवर करावसं वाटतं!

**नाव : रोहन हरिचंद्र दिवे**
एफ. वाय. बी. कॉम.



# पुस्तक

पुस्तके आपले मित्र आहेत
सर्वांच्या ज्ञानाची भांडार आहेत
पुस्तक जग चालवते
ज्ञानाची कळी उमलवते
पुस्तक आपल्याला नवयुगाच्या गोष्टी सांगते
न पाहिलेले माणूस दाखवते
न पाहिलेले जग दाखवते
पुस्तक आपल्याला प्रेमाच्या जगात घेऊन जाते
समानतेचा मार्ग दाखवते
पुस्तक आपल्याला इतिहास सांगते
ठिक-ठिकाणांची माहिती दाखवते
पुस्तकातून आपल्याला ज्ञान प्राप्त होते
ज्ञानाचे भांडार भरले जाते
नवीन - नवीन ज्ञानाची माहिती करून देते
पुस्तक आपल्याला मार्ग दाखवते
चांगल्या रस्त्याला घेऊन जाते
ही पुस्तके
आपल्याला चांगला माणूस बनवतात..

**तुळशीराम दिघा**
**एफ. वाय. बी. ए.**



# अवकाळी पाऊस

ऐन उन्हाळात मेघ गडगड करी
धो धो पावसासह पडू लागल्या गारा
मात्र यात होरपळून गेला शेतकरी
अवकाळी पावसाचा फटका बसला सारा

अवकाळी पावसाचे बळीराजाचे
डोळे ओलेचिंब झाले
असे कसे केव्हाही निसर्गाचे
ऋतू बदलू लागले

भिजून गेला शेतकऱ्याचा शेत सारा
शेतामधील उभ पीक भुईसपाट झाला
निसर्गावरतीच अवलंबून राहणारा
त्याचाच घात कसा झाला

काढणीस आलेल्या पिकास
तोंडचं दूर घेऊन गेला
कष्टाचे खाणारा दोन घास
शेतकरी उपाशीच राहिला

शेतीच्या नुकसानीचा कोणी केला नाही पंचनामा
शेतकऱ्याला लागतो गळ्याभोवती दोर लावावा
तेव्हा कुठे होतो कर्जमाफीचा जाहीरनामा
मायबाप सरकार शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबवा

**वारघडे मनोज भागीरथ**
**एम. ए. (II)**

# पुस्तक आणि ती

जेवढे प्रेम पुस्तकांवर केले
तेवढेच प्रेम तिच्यावरही केले
तिच्या प्रेमापायी पुस्तकाला सोडले
अन् तिही मला सोडून गेली

तिच्याकडे जेवढे मन लागायचे ना
तेवढेच पुस्तकात लागणं गरजेचं होतं
मन सांगे पुस्तक अन् तिलाही सोबतीला धर
पण काय करावं ते समजत नव्हतं

ती मिळेल की नाही माहीत नाही
पण माझ्या स्वप्नांवर माझा विश्वास होता
पुस्तके वाचली असती तर बर होतं
तिला वाचण्यात वेळ माझा व्यर्थ होता

पुस्तक लिहिणारा जसा लेखक असतो
पण समजण्यासाठी पूर्ण वाचणारा वाचक लागतो
दोघांवरचं प्रेम समजण्यासाठी आधी कराव लागं
हे तिला समजून सांगावं लागतं

बुद्धीलाही गंज आला होता
पुस्तकेही धुळीस मिळाली होती
हरवलेलं स्वप्न पुन्हा आठवलं
पुस्तकांनी मला वाचायला लावलं

प्रेम करावं कसं हे ती शिकवून गेली
अन् जीवन जगाव कसं हे पुस्तकानं शिकवलं
वाचता वाचता पुस्तकही प्रेयसी झाली
नशिबात आता पुस्तकेच उपयोगी आली

**वाघरडे मनोज भागीरथ**
**(एम. ए. II)**

# आम्ही आदिवासी पोरं

आम्ही आदिवासी पोरं
आम्हाला शिक्षणाचं जोरं
अंगात नाही कापडं
तरी हिंडतो रानवनं

कुणाकड हात नाही पसरत
मेहनत करूनी खातो कष्टाची भाकरी
नाही बंगला आमचा, राहतो झोपडीत
सोडत नाही एकमेकांची सात?

नाही चांगला मान
तरी- जगतो छान!
आम्ही आदिवासी आहेत
हाच आमचा अभिमान!

किती येऊनी गेले नेते आपण करूनी
नाही सोय पाण्याची, रस्त्याची अन् विजेची
जंगलात राहतो हे दिसत का नाही
आमच्यापर्यंत विकासाचं पाऊस पडत का नाही.

आता तरी येणा?
आमची हालत पाहणा,
येई सोसाट्यांचा वारा
उठवून नेई गवताची घरा.

आमचं घर शेत रानं
जेवतो झाडाच्या पानावर
खातो कांदाभाकर अनं मिरची
एकत्र बसुनी हसतमुखानं.

# जीवन

**जगा इतके की,**
**आयुष्य कमी पडेल..**
**आणि हसा इतके की,**
**आनंद कमी पडेल..**
**आणि काही मिळेल**
**किंवा**
**नाही मिळेल..**
**तो नशिबाचा खेळ आहे..**
**पण,**
**प्रयत्न इतके करा की,**
**परमेश्वराला ही देणे भागच**
**पडेल...**

**– प्रल्हाद खुताडे**
**(एस. वाय. बी. ए. )**



# प्रेमाची मंदी...

प्रेमाची मी तिच्याकडे मागणी केली
पुरवठा मात्र तिन्हे केलाच नाही
कदाचित प्रेमाचा साठा तिच्याकडे नव्हता
या प्रेमाच्या मागणीचा वक्र ऋणात्मक ठरला
पहिलीच गुंतवणूक केली होती प्रेमाची
नफ्याचा हेतू ठेवलाच नव्हता
म्हणूनच तर प्रेमात तोटाच झाला
दुःखाचा कर्ज माझ्यावर कायमच राहिला
प्रेमात मी संयोजक होतो
तिच्यासाठी कौशल्ये माझे कमीच पडले
प्रेमाचा अनुभव कधी घेतलाच नव्हता
म्हणून मोबदला मला मिळालाच नाही
दुःखाचा कर्ज होता माझ्यावर
सुखाचा व्याज तिला द्यायचा होता
तिचं विलीनीकरण दुसऱ्यासोबत झालं होते
तरीही विश्वासार्हता तिच्यावरची कायमच होती
तिच्याकडे तिच्या प्राप्तीची मी संकल्पना मांडली
पहा तिला माझ्यात पैशाची कमतरता वाटली
एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण झालीच नाही
या प्रेमाच्या बाजारात किंमत माझी शून्य ठरली
उपभोगासाठी तिच्यावर प्रेम केलंच नव्हतं
तिला सेवा उपयोगिता दयायची होती
प्रेमात कधी तिचा उपयोग केलाच नव्हता
कदाचित प्रेम हाही एक उपयोगितेचा घटक ठरला
तिच्यासाठी श्रम माझे कमी पडले
प्रेमाची संकल्पना तुटीची ठरली
प्रेमात माझ्या मंदी आली
तिचा परिणाम जगण्यावर झाला

**वारघडे मनोज भागीरथ**
**(एम. ए. II)**



# आई

**तुझ्या लेकरांसाठी स्वतःच्या इच्छा**
**तुला कधी पूर्ण करताच**
**आल्या नाहीत ।।१।।**
**तुझ्या मनात असलेली भीती तू**
**कधीही जगासमोर**
**दाखवली नाहीस।।२।।**
**तुझ्या डोळ्यांत आलेलं पाणी**
**आम्हाला कधी समजून**
**घेतली नाही।।३।।**
**आमचं तुझ्यावर असलेलं प्रेम**
**आम्हाला कधी व्यक्त करताच**
**आलं नाही।।४।।**

**- विलास भोंबे**

# शेर

**इतनी आसानी से ना**
**हारूंगा ये जिन्दगी**
**अभी तो खेलना शुरु किया है!**
**अभी असली खेल बाकी है...!!**

**प्रल्हाद खुताडे, (एस वाय बी ए)**

# अहवाल विभाग

# अंतरंग


१. मराठी विभाग
२. अर्थशास्त्र विभाग
३. इतिहास विभाग
४. ग्रंथालय विभाग
५. मानसशास्त्र विभाग
६. वनस्पतीशास्त्र
७. प्राणीशास्त्र विभाग
८. इंग्रजी विभाग
९. वाणिज्य विभाग
१०. गणित विभाग
११. भौतिकशास्त्र विभाग
१२. रसायनशास्त्र विभाग
१३. आयक्यूएसी
१४. अँटी रॅगिंग कमिटी
१५. परीक्षा विभाग
१६. सेवक निवास समिती
१७. ग्रिव्हन्स रेड्रेसल कमिटी
१८. प्लेसमेंट सेल
१९. माजी विद्यार्थी मंडळ
२०. शॉर्ट टर्म कोर्स कमिटी
२१. गांधी विचार संस्कार परीक्षा
२२. एस.सी./ एस.टी. सेल
२३. कमवा व शिका योजना
२४. आविष्कार कमिटी
२५. बायो–फ्लॉक प्रकल्प
२६. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
२७. अंतर्गत तक्रार निवारण समिती
२८. कर्मवीर विद्या प्रबोधिनी
२९. रिसर्च कमिटी
३०. सायटेक सोयामेट प्रकल्प
३१. वॉलपेपर कमिटी
३२. स्टाफ अॅकॅडमी
३३. प्रसिद्धी विभाग
३४. जिमखाना विभाग
३५. राष्ट्रीय सेवा योजना
३६. विद्यार्थी परिषद समिती
३७. खरेदी व बांधकाम समिती
३८. बोटॅनिकल गार्डन
३९. सांस्कृतिक विभाग
४०. परिसर विकास आणि सुशोभिकरण समिती
४१. सायन्स असोसिएशन

# मराठी विभाग

